दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक
७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची
शुक्रवार, दि. २९ मे २०२६
www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews
संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १५३ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये


# ३० मे पासून उपोषण करणार : मनोज जरांगे

## एकतर सरकारचा तुकडा पडेल नाहीतर माझ्या जीवाचा



**आंतरवाली (दै. संध्या)**

आंतरवालीमध्ये 30 मे रोजी रखरखत्या उन्हात बाजेवर बसत आमरण उपोषण करणार आहे. ना पाणी घेणार ना काही जे होईल ते होईल. आता उष्माघाताने माझा बळी गेला तर तो मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यामुळेच गेला, असे मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले आहे. आता होणारे उपोषण खूप कडक होणार आहे. वेदनांचा काहीही विचार मी करणार नाही. एकतर सरकारचा तुकडा पडेल नाही तर माझ्या जीवाचा तुकडा पडेल या भूमिकेवर मी आलो आहे.

मनोज जरांगे पाटील म्हणाले की, आपण सरकारला पाहिजे त्यापेक्षा जास्त वेळ दिला आहे. 29 मे रोजी 10 महिने पूर्ण होत आहेत. यापेक्षा किती जास्त वेळ सरकारला द्यायचा, गोरगरीब मराठ्यांच्याच लेकरांवर का अन्याय केला जातो? असा सवाल मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे. आपल्या समाजाला काही मिळत नसेल तर कठोर पाऊल उचलावे लागतील.

मनोज जरांगे पाटील म्हणाले की, मला काही प्रसाद लाड यांना दोष द्यायचा नाही. त्यांनी सांगितले की मी मराठा आहे. पण आता त्यांचे डोळे उघडले असतील की त्यांचे देवेंद्र फडणवीस किती कलाकार आहेत आणि म्हणून आपण त्यांना बोलतो. मी उगाच कोणाला बोलत नाही. त्यांनी आमच्या माता-भगिणींना मारले म्हणून आम्ही त्यांना बोलतो. देवेंद्र फडणवीस यांच्या मनामध्ये मराठा समाजाविषयी द्वेष भरलेला आहे. त्यांना मराठा समाजावर अन्याय करायचा आहे. मनोज जरांगे पाटील म्हणाले की, अनेकांचे फोन आले पण मी फोनवर चर्चा करणार नाही. माझ्या समाजासाठी मी काम करत आहे. इतके क्रुर सरकार कधी आले नसेल. पश्चिम महाराष्ट्रातील मराठा समाज सधन आहे म्हणून त्यांना आरक्षण देता येणार नाही, असे सरकार सांगते. मराठवाड्यात पाणी नाही आणि आरक्षण नाही. तुम्हाला जर खेटायचे असेल तर आता आपण खेटूच. अजित पवार आणि एकनाथ शिंदेंचे मंत्री आमच्याकडे येतात म्हणून त्यांना टार्गेट केले जाते. मुख्यमंत्री आरोग्य सहाय्यता निधी मिळत नाही. मराठ्यांकडे कोणता मंत्री जाऊ नये ही त्यांची भूमिका. मनोज जरांगे पाटील म्हणाले की, आता जे होईल ते होईल मी माझ्या शरीराचा विचार करणार नाही. माझ्या समाजासाठी सर्व काही करण्याची माझी तयारी आहे. समाज बांधवांनी आंतरवालीकडे येऊ नये. सरकारला मराठा समाजाबद्दल माया असती तर त्यांनी आरक्षण दिले असते. सरकार केवळ बोलते आहे, समाजासाठी काही होणार नाही. मंडप न टाकता आम्ही हे उपोषण करणार आहोत. मला केवळ चर्चा नको आहे. तर माझ्या बांधवांना आरक्षण मिळणार आहे का? सरकार दुटप्पी भूमिका घेत आहे. पोलिस कट रचून आमच्यावर हल्ले करतात, त्यांच्यावर गुन्हे दाखल केले जात नाही, आणि आमच्यावर गुन्हे दाखल केले आहेत.

### सरकार काही काम करत नाही

मनोज जरांगे पाटील म्हणाले की, मराठ्याचे कुटुंब उघड्यावर पडले आहेत. सरकारकडून साधेसाधे काम केले जात नाही. मराठा-कुणबी मंत्रालय स्थापन करायला किती वेळ लागतो? पण ते केले नाही. ओबीसींनी न मागता त्यांच्यासाठी मंत्रालय स्थापन करण्यात आले. मराठा आणि कुणबी एक असून सुद्धा जीआर काढला नाही. आमच्या नोकऱ्या कोणी लाटल्या. सरकारने 50 वर्षांमध्ये आमचे वाटोळे का केले. आमच्या 5 पिढ्यांचे नुकसान कोण भरूण काढणार.

# ग्रामविकास भवनातून ग्रामीण प्रशासनाला मिळणार नवी दिशा : जयकुमार गोरे



**मुंबई (दै. संध्या)**

खारघर, नवी मुंबई येथे उभारण्यात आलेल्या ग्रामविकास भवन या शासकीय इमारतीची आज ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे यांनी पाहणी केली. ग्रामविकास व पंचायत राज विभागाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी, प्रशासकीय समन्वय तसेच प्रशिक्षण उपक्रमांसाठी हे संकुल महत्त्वपूर्ण केंद्र म्हणून विकसित करण्यात आले आहे. यावेळी ग्रामविकास भवनातील विविध प्रशासकीय विभाग, प्रशिक्षण कक्ष, बैठकींसाठी उपलब्ध सुविधा तसेच इतर पायाभूत सुविधांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. ग्रामीण भागातील विकासकामांना अधिक गती देण्यासाठी सक्षम व आधुनिक प्रशासकीय यंत्रणा उभारणे आवश्यक असून,

**ग्रामविकास भवनाच्या विविध सुविधांची पाहणी**

त्यादृष्टीने ग्रामविकास भवनाची भूमिका महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. ग्रामीण विकास विभागाच्या कामकाजात अधिक सुसूत्रता, समन्वय आणि कार्यक्षमता निर्माण व्हावी, यासाठी आधुनिक तंत्रज्ञान व सुविधा उपलब्ध करून देण्यावर शासनाचा भर असल्याचेही यावेळी स्पष्ट करण्यात आले. राज्यातील ग्रामविकासाशी संबंधित विविध उपक्रम, प्रशिक्षण प्रक्रिया आणि प्रशासकीय नियोजन अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी ग्रामविकास भवन हे केंद्र उपयुक्त ठरेल, असा विश्वास यावेळी ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे यांनी व्यक्त केला.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी चर्चा



**नवी दिल्ली (दै. संध्या)**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नवी दिल्ली येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सदिच्छा भेट घेतली. या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी राज्याच्या विकासाच्या विविध प्रकल्पांबाबत पंतप्रधानांशी चर्चा केली. या भेटीदरम्यान मुख्यमंत्री फडणवीस यांनी महाराष्ट्रात सध्या सुरू असलेल्या विविध महत्त्वाकांक्षी आणि पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांची सद्यस्थिती आणि त्यांच्या प्रगतीबाबत पंतप्रधानांना सविस्तर माहिती दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट ही नेहमीच अत्यंत प्रेरणादायी आणि सकारात्मक ऊर्जा देणारी असते, अशी भावना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या भेटीनंतर व्यक्त केली. मुख्यमंत्री फडणवीस कालपासून दिल्ली दौऱ्यावर असून केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह आणि केंद्रीय जलशक्ती मंत्री सी आर पाटील यांच्या समवेत काल ऊस आणि कांदा उत्पादकांच्या विविध प्रश्नांबाबत तसेच राज्यातील सिंचन प्रकल्प, जलजीवन मिशनची कामे आदींबाबत महत्त्वपूर्ण बैठका झाल्या आहेत.

# मराठा समाज, समान नागरी कायदा आणि विकासावर सरकार ठाम

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे : आमच्यात मतभेद नाहीत, विधान परिषद निवडणुकीत महायुती १७ पैकी १७ जागा जिंकणार

**नवी दिल्ली (दै. संध्या)**

विधान परिषदेच्या १७ जागांसाठी महायुती एकजुटीने निवडणूक लढवणार असून सर्व १७ जागांवर विजय मिळवणार, असा ठाम विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. दिल्ली येथे पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी महायुतीमध्ये कोणतेही मतभेद नसल्याचे स्पष्ट करत जागावाटप सन्मानाने होईल, असे सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यापूर्वीच जागावाटपाचा फॉर्म्युला स्पष्ट केला असल्याचे सांगत, "महायुती मजबूत आहे, आम्ही एकत्र काम करत आहोत आणि महाराष्ट्राचा विकास वेगाने पुढे नेत आहोत," असे शिंदे म्हणाले. एक तारखेपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत असताना "आमच्या आधी मीडियालाच एवढी घाई का झाली आहे?" असा सवालही त्यांनी केला.



मराठा आरक्षण आणि मनोज जरांगे यांच्या आंदोलनाबाबत विचारले असता, सरकार मराठा समाजाच्या प्रश्नांबाबत पूर्णपणे संवेदनशील असल्याचे शिंदे यांनी स्पष्ट केले. भाजप आमदार प्रसाद लाड यांनी मनोज जरांगे यांची भेट घेऊन त्यांच्या मागण्या ऐकून घेतल्याची माहिती त्यांनी दिली.

"मी मुख्यमंत्री असताना अजितदादा आणि देवेंद्रजींसोबत मिळून मराठा समाजासाठी ऐतिहासिक निर्णय घेतले. कुणबी प्रमाणपत्र देण्याचा निर्णय, न्यायमूर्ती शिंदे समितीची स्थापना आणि १० टक्के आरक्षण देण्याचे काम आम्ही केले," असे सांगत त्यांनी सरकारने अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातूनही समाजाला न्याय देण्याचा प्रयत्न केल्याचे नमूद केले.

उर्वरित प्रश्न सोडवण्यासाठी सरकार सकारात्मक असून मनोज जरांगे यांना उपोषण करण्याची वेळ येऊ नये, ही सरकारची भूमिका असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

आसाममध्ये समान नागरी कायदा लागू करण्याच्या निर्णयाचे स्वागत करत शिंदे यांनी आसामचे मुख्यमंत्री हिमांता बिस्व सर्मा यांचे अभिनंदन केले. "एक देश, एक कायदा" ही शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांची भूमिका सुरुवातीपासूनच राहिलेली आहे, असे त्यांनी सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही अनेकदा एका देशात दोन कायदे असू शकत नाहीत, असे स्पष्ट केले असल्याचे सांगत, महाराष्ट्रातही या विषयावर सकारात्मक विचार केला जाईल, असे शिंदे यांनी म्हटले.

बाळासाहेब ठाकरे यांची राम मंदिर, कलम ३७० हटवणे आणि समान नागरी कायदा ही तीन स्वप्ने होती. त्यापैकी दोन स्वप्ने पूर्ण झाली असून तिसरे स्वप्नही पूर्ण होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

आदिवासी तसेच अनुसूचित जाती-जमाती समाजाच्या आरक्षणावर समान नागरी कायद्याचा कोणताही परिणाम होणार नसल्याचे स्पष्ट करत, काहीजण समाजात दिशाभूल करत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

खासदार संजय राऊत यांच्या विधानांवर प्रतिक्रिया देताना शिंदे म्हणाले, "महायुती मजबूत आहे आणि महाराष्ट्राचा विकास वेगाने सुरू असल्याने विरोधक अस्वस्थ झाले आहेत." भारतीय जनता पक्ष हा देशातील नंबर एकचा पक्ष असून शिवसेना दुसऱ्या क्रमांकाची ताकद असल्याचे सांगत त्यांनी विरोधकांवर निशाणा साधला.

उद्धव ठाकरे यांचे नाव न घेता, "देवेंद्र फडणवीस यांच्यावर टोकाची भाषा करणाऱ्यांची आज काय अवस्था झाली आहे, हे महाराष्ट्राने पाहिले आहे," असा टोला त्यांनी लगावला.

मुंबईतील बीच कँडी क्लब येथे मेंबरशिपसाठी युरोपियन पासपोर्टची अट असल्याच्या प्रश्नावर शिंदे यांनी कठोर भूमिका घेतली."मुंबईत असा कोणताही भेदभाव करणारा क्लब असेल तर त्याची चौकशी करण्यात येईल,"असे स्पष्ट मत त्यांनी व्यक्त केले.


क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
e-paper www.sandhyaepaper.com


## ढिंग-टांग




## 'नीट' पेपरफुटी रोखण्यासाठी आता थेट लष्कर मैदानात

# वायूदलाच्या विमानांनी पोहोचवणार पेपर

**मुंबई (दै. संध्या)**




देशभरात सातत्याने गाजत असलेल्या वैद्यकीय प्रवेशासाठीच्या 'नीट' परीक्षेतील घोटाळे आणि पेपरफुटीच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकार आता पूर्णपणे ॲक्शन मोडमध्ये आलं आहे. आगामी 21 जून रोजी होणारी नीटची फेरपरीक्षा अत्यंत पारदर्शक, सुरक्षित आणि योग्य रीतीने पार पाडण्यासाठी सरकारनं थेट भारतीय लष्कराची मदत घेण्याचा निर्णय घेतला आहे. इतकंच नव्हे, तर देशातील सर्व परीक्षा केंद्रांवर गोपनीय पेपर्स सुरक्षितपणे पोहोचवण्यासाठी भारतीय वायूदलाची मदत घेतली जाणार आहे. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी ही माहिती दिली. नीटच्या फेरपरीक्षेच्या नियोजनासंदर्भात आज देशाची राजधानी दिल्लीमध्ये एक अत्यंत उच्चस्तरीय आणि महत्त्वाची बैठक पार पडली. केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या अधिकृत निवासस्थानी ही बैठक पार पडली. या महत्त्वपूर्ण बैठकीला केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान, केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया, एनटीएचे (NTA) महासंचालक अभिषेक सिंह, सीबीएसईचे (CBSE) वरिष्ठ अधिकारी आणि पंतप्रधान कार्यालयातील काही वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत 21 जून रोजी होणाऱ्या फेरपरीक्षेच्या संपूर्ण सुरक्षा व्यवस्थेवर सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीनंतर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी खास संवाद साधताना या ऐतिहासिक निर्णयाची घोषणा केली.

परीक्षेतील वाढते गैरप्रकार रोखण्यासाठी आणि देशभरातील लाखो विद्यार्थ्यांचा तसेच पालकांचा विश्वास पुन्हा निर्माण करण्यासाठी केंद्र सरकारने कंबर कसली आहे. या बैठकीत नीट परीक्षा अधिक पारदर्शक आणि 'फुलप्रूफ' करण्याबाबत विविध मुद्द्यांवर सखोल चर्चा झाली. परीक्षा प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर तांत्रिक सुधारणा केल्या जाणार असून, संवेदनशील परीक्षा केंद्रांवर कडक पहारा ठेवण्यात येणार आहे. पेपर लीकचा कोणताही मार्ग उरणार नाही, अशा प्रकारे तांत्रिक आणि मानवी सुरक्षा यंत्रणा तैनात केली जाईल. पेपर वाहतुकी दरम्यान होणारे गैरप्रकार टाळण्यासाठीच वायूदलाच्या विशेष विमानांची मदत घेतली जाणार आहे. नीट परीक्षेतील गैरप्रकार उघडकीस आल्यानंतर देशभरातून मोदी सरकारवर जोरदार टीका झाली होती. विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ होत असल्याच्या तक्रारींनंतर आता खुद्द गृह आणि संरक्षण यंत्रणा या परीक्षेत लक्ष घालत आहेत. लष्कर आणि वायूदलाच्या थेट सहभागामुळे परीक्षा केंद्रांवर पेपर पोहोचण्यापासून ते परीक्षा संपेपर्यंत कडेकोट बंदोबस्त असणार आहे. आता 21 जूनच्या फेरपरीक्षेत कोणताही अडथळा येऊ नये, यासाठी यंत्रणा दिवसरात्र काम करत आहे. दुसरीकडे, देशभरात खळबळ उडवून देणाऱ्या नीट पेपरफुटी प्रकरणाच्या तपासाला आता मोठ्या आर्थिक व्यवहारांची जोड मिळताना दिसत आहे.

या प्रकरणातील मुख्य संशयित अटक आरोपी शिवराज मोटेगांवकर आणि त्याच्या कुटुंबीयांशी संबंधित बँक खाती आणि लॉकर्सची पडताळणी आता केंद्रीय अन्वेषण विभागाकडून सुरू करण्यात आली आहे. सीबीआयचे पथक या लॉकर्समध्ये मोठी रोख रक्कम, बेकायदेशीर मालमत्तेशी संबंधित कागदपत्रे, डिजिटल पुरावे आणि बँक व्यवहारांची माहिती शोधत आहे. या आंतरराज्यीय पेपर लीक रॅकेटच्या आर्थिक व्यवहारांशी संबंधित महत्त्वाचे दस्तऐवज सीबीआयच्या हाती लागण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.

# पीसीपीएनडीटी कायद्याची कठोर अंमलबजावणी करा

## सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर

**मुंबई (दै. संध्या)**



बेकायदा गर्भलिंग निदान आणि स्त्री भ्रूणहत्या करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करण्यासाठी पीसीपीएनडीटी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होणे अत्यंत आवश्यक असल्याचे स्पष्ट करत सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी जिल्हा आणि महापालिका स्तरावरील समित्या अधिक बळकट करण्याचे निर्देश दिले. चुकीचे काम करणाऱ्यांमध्ये कायद्याचा वचक निर्माण व्हावा, यासाठी व्यापक प्रमाणात कारवाई करावी,असेही त्यांनी सांगितले.

पीसीपीएनडीटी कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसंदर्भात राज्य पर्यवेक्षकीय मंडळाची बैठक आरोग्य भवन येथे मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. बैठकीस आमदार स्नेहा दुबे, प्रधान सचिव निपुण विनायक, अतिरिक्त संचालक डॉ. संदीप सांगळे, उपसंचालक (विलटो) डॉ. दिगंबर कानगुले, सहाय्यक संचालक डॉ. वैशाली बडधे, विधि सल्लागार ॲड. भाग्यश्री रंगारी यांच्यासह आरोग्य विभागाचे संबंधित अधिकारी उपस्थित होते.

मंत्री आबिटकर म्हणाले, स्त्री भ्रूणहत्या रोखण्यासाठी बेकायदेशीर प्रसवपूर्व गर्भलिंग निदान करणाऱ्यांवर शून्य सहनशीलतेचे धोरण अवलंबण्यात यावे. चुकीचे काम करणाऱ्यांमध्ये भीती निर्माण होणे आवश्यक असून, गर्भलिंग निदान करणाऱ्या हॉस्पिटल्सवरील तपासण्या वाढवून दोषींवर कठोर कारवाई करावी. पीसीपीएनडीटी कायद्यांतर्गत स्थापन करण्यात आलेल्या समित्यांचे कामकाज अधिक प्रभावी होणे आवश्यक असून, समित्यांच्या नियमित बैठका घेण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. प्रसवपूर्व गर्भलिंग निदानास आळा घालण्यासाठी समित्यांनी 'मिशन मोड'वर काम करून दोषींवर कडक कारवाई करावी, असे निर्देश देताना खबरी बक्षीस योजनेत अधिकाधिक खबऱ्यांचा सहभाग वाढवण्यासाठी यंत्रणांनी प्रयत्न करावेत, असेही त्यांनी सांगितले. जनजागृती आणि प्रबोधन यालाही तितकेच महत्त्व असल्याचे नमूद करत राज्यभर कायद्याविषयी व्यापक जनजागृती मोहीम राबवावी, असे निर्देश त्यांनी दिले. समाज माध्यमे, स्थानिक स्वराज्य संस्था आणि आरोग्य यंत्रणेच्या माध्यमातून प्रचार-प्रसार वाढवण्यावर भर द्यावा, अशा सूचनाही त्यांनी केल्या.

बैठकीत २३ सप्टेंबर रोजी झालेल्या बैठकीतील मुद्द्यांचा आढावा, आतापर्यंत करण्यात आलेली स्टिंग ऑपरेशन्स, पीसीपीएनडीटी कायद्यांतर्गत सुरू असलेली न्यायालयीन प्रकरणे तसेच स्त्री भ्रूणहत्या रोखण्यासाठी सुरू असलेल्या कारवाईचा आढावा घेण्यात आला.

## संपादकीय

# अर्जुननं ‘चक्रव्यूह’ भेदला! हा ‘रन’संग्राम सोपा नाही, पण...

'दंगल' सिनेमात एक जबरदस्त सीन आहे. महावीरसिंह फोगाट आपल्या लेकीला - गीताला पहिल्यांदा दंगल लढायला घेऊन जातात. मुलगी आहे, पहिल्यांदाच आखाड्यात उतरतेय म्हणून तिलाच तिचा प्रतिस्पर्धी निवडायची संधी दिली जाते. तिच्यापुढे चार पैलवान उभे केले जातात. एक अगदीच 'काडी पैलवान' असतो, एक फारच कोवळा, एक नवशिक्या आणि चौथा थोडा तयार गडी - हट्टाकट्टा. गीता या चौथ्या पैलवानाविरुद्ध पहिली कुस्ती लढायचं ठरवते. हे पाहून सगळेच अवाक् होतात. पोरगी 'येडी' झालीय म्हणतात. पण, 'बाप' महावीरसिंह खूश होतो. तो म्हणतो, "दंगल लड़ने से पहले डर से लड़ना पड़ता है, और मेरी छोरी डर से तो जीत गयी है।" हा प्रसंग आणि संवाद आत्ता आठवण्याचं कारण म्हणजे, अर्जुन सचिन तेंडुलकरने केलेला चमकदार, लक्षवेधी खेळ. संधीचं सोनं करणं काय असतं, हे त्या दिवशी त्यानं दाखवलं. अर्थातच, आयपीएलच्या एका सामन्यातील कामगिरीच्या आधारे अर्जुन प्रगल्भ, परिपूर्ण क्रिकेटपटू किंवा गोलंदाज ठरत नाही. त्याच्यासारखे किंवा त्याच्यापेक्षा सरस बरेच जण आहेत. पण, 'सचिन तेंडुलकरचा मुलगा' म्हणून देशभरातील क्रिकेटप्रेमींच्या अपेक्षांचं जे एक ओझं किंवा दडपण अर्जुनवर असेल, तो 'चक्रव्यूह' त्यानं अखेर भेदला, हे मान्यच करावं लागेल. अनेकांना ते जमलेलं नाही - जमत नाही. क्रिकेट, सिनेमा, राजकारण, उद्योग अशा अनेक क्षेत्रांमध्ये वडिलांच्या छायेतच अडकून पडलेली अनेक मुलं आपण पाहिली आहेत. ती त्यांचं वेगळेपण, कर्तृत्व सिद्धच करू शकली नाहीत. ते अर्जुन तेंडुलकर हळूहळू करून दाखवतोय, हे नक्कीच उल्लेखनीय आहे. मुळात, 'क्रिकेटचा देव' अशी उपाधी मिळवलेल्या सचिन तेंडुलकरच्या मुलानं क्रिकेटमध्येच करिअर करण्याचा निर्णय घेतला, इथेच तो गीताकुमारी फोगाटसारखा 'डर से जीत गया' असं म्हटलं तर वावगं नाही. कारण, प्रत्येक टप्प्यावर त्याची तुलना 'बाप'माणसाशी होणार होती. 'तो दर्जा' दाखवता आला नाही तर खिल्ली उडवली जाणार होती. जरा चांगली संधी मिळाली की 'सेटिंग' म्हणून बघितलं जाणार होतं आणि अपयशी ठरला तर तो मोठाच गुन्हा ठरणार होता. या सगळ्याची कल्पना सचिनने त्याला दिली असेलच. तरीही, तो त्याच्या निर्णयावर ठाम राहिला, ही मोठी गोष्ट आहे. सचिननं कमावलेलं नाव, पैसा या जोरावर अर्जुन सुखेनैव काहीही करू शकत होता किंवा काहीही न करताही सुखात जगू शकत होता. पण, त्याने मैदानावर घाम गाळायचं ठरवलं. जिद्दीनं - चिकाटीनं लढत राहायचं, प्रयत्न करत राहायचं, टीकेला-ट्रोलिंगला कामगिरीतून उत्तर द्यायचं ठरवलं आणि ते त्यानं केलंही. एकीकडे वैभव सूर्यवंशी, प्रशांत वीर, कार्तिक शर्मा, आयुष म्हात्रे, अंगक्रिश रघुवंशी हे उगवते तारे आयपीएलमध्ये चमकत आहेत. 'मॅच विनिंग' खेळी करून दाखवत आहेत. मग, अर्जुनच्या एका मॅचमधील कामगिरीचं एवढं काय कौतुक, असं वाटूच शकतं. एकतर लखनौ सुपर जाएंट्सचं आव्हान संपुष्टात आलं होतं. २३ मे रोजी ते आयपीएल २०२६ मधला त्यांचा शेवटचा सामनाच खेळत होते. त्यामुळे 'निर्णायक' असं काही नव्हतं. त्या सामन्यात अर्जुन तेंडुलकरला संधी दिली गेली. त्याआधी सगळे सामने तो बेंचवर होता. अधे-मधे पाण्याच्या बाटल्या घेऊन येत होता. नेट्समध्ये फलंदाजांना सराव करण्यासाठी बॉलिंग टाकत होता. विशेष म्हणजे, हे त्याच्या बाबतीत पहिल्यांदा होत नव्हतं. २०२१ मध्ये मुंबई इंडियन्सनं अर्जुनला संघात घेतलं. तेव्हा 'वडिलांची कृपा' असंच त्याकडे पाहिल गेलं. पण, २०२१ आणि २०२२ ही दोन्ही वर्षं अर्जुनला एकाही सामन्यात खेळवलं गेलं नाही. अर्थात, या काळात त्याला शिकता बरंच आलं असेल. त्या जोरावरच २०२३ मध्ये मुंबई इंडियन्सनं त्याला चार सामन्यांमध्ये खेळवलं. त्यात त्यानं तीन विकेट्सही घेतल्या.

## संस्कृत सुभाषित

वायुरायुर्बलं वायुर्वायुर्धाता शरीरिणाम् ।
वायुर्विश्वमिदं सर्वं प्रभुर्वायुश्च कीर्तितः ।।

अर्थ – प्राणवायु म्हणजेच जीवन होय, प्राणवायु म्हणजेच सामर्थ्य. प्राणवायुच शरीर धारण करतो. हे सर्व विश्व प्राणवायूचेच आहे. णवायूच सर्वांचा मालक आहे अशी त्याची कीर्ती आहे.

## गुरु वचन

### कर्मयोगासाठी कौशल्य असणे आवश्यक


माणसाला त्याने केलेल्या कर्मानुसार फळ मिळत असते. परंतु बऱ्याजणांची तक्रार असते की, आपण दिवसभर राबूनही कसेबसे पोटापुरते मिळते, तर तेच काम करणारा आपला शेजारी मात्र सुखात असतो. तसेच तो काम केल्यानंतर समाधानीही दिसतो. गीतेत भगवंतानेही म्हटले आहे की कर्मयोग याचा अर्थ कौशल्याने वा शास्त्रीय पध्दतीने काम करणे. कर्मानुष्टानाचा विधी व्यवस्थित समजून घेतल्यासच माणसाला उत्तम फळ मिळू शकते. सर्व कर्मांचा उद्देश मनामध्ये पूर्वीपासून असलेली शक्ती प्रकट करणे व आत्मा जागृती करणे, प्रत्येक माणसामध्ये पूर्ण ज्ञान व पूर्ण शक्ती असते. निरनिराळी कर्मे या महान शक्ती जागृत करण्याचे व प्रकट करण्याचे फक्त साधन आहे. या साधनाचा आपण किती कौशल्याने वापर करतो यावर त्याचे फळ अवलंबून असते.

## सुविचार

एखाद्या सच्च्या वैज्ञानिकाला जर त्याच्या विज्ञानाविषयी एखादा अत्यंत गहन प्रश्न विचारला तर तो वैज्ञानिक नि:शब्द होईल, आणि एखाद्या सच्च्या धार्मिक मनुष्याला जर त्याच्या धर्माविषयी एखादा अत्यंत साधा प्रश्न विचारला तर तो धार्मिक मनुष्य क्रुद्ध होईल.

– केदार जोशी

## उपदेशकथा



पं. मदनमोहन मालवीय हे काशीचे कर्मठ ब्राह्मण. स्नानसंध्या, पूजा–अर्चा यात कधी कसूर करत नसत त्यामुळे होई काय, आगगाडी वेळेवर पकडण्याचे ‘पातक’ त्यांच्याकडून होत नसे! एकदा मालवीयजी धापा टाकीत स्थानकावर पोहचले नि गाडी सुटणार एवढ्यात कसाबसा त्यांनी डबा गाठला पण तिकिट काढायचे गडबडीत राहून गेले. अलाहाबाद या स्थानकावर उतरून त्यांनी तिकिट तपासनिसांना आपली अडचण सांगितली. त्याने सांगितले, ‘आम्ही तुम्हाला ओळखतो. तुम्ही खुशाल बाहेर पडा !’ पण या गोष्टीला त्यांची सदसद्विवेकबुद्धी राजी होईना. ते म्हणाले, ‘तुम्ही माझ्याकडून तिकिटाचे पैसे घ्या’ तपासनीस म्हणाला, ‘तुम्हाला मग भुर्दंडही भरावा लागेल!’ त्यालाही मालवायजी तयार नव्हते. शेवटी त्यांनी चिरंजीवांना तिकिट खिडकीवर पाठवून अलाहाबाद ते बनारसचे तिकिट आणवले नि तपासनिसांसमोर त्याचे तुकडे केले व मगच ते बाहेर पडले!

कथा उपदेश : फुकट प्रवास करू नये.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | तिथि:त्रयोदशी ०९:५०:५७ |
| २९ मे २०२६ | नक्षत्र:स्वाती १०:३७:३९ |
| शुक्रवार | योग:परिध २८:३५:०७+ |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:तैतिल ०९:५०:५७ |
| अधिक ज्येष्ठ शके | करण:गर २२:५३:१० |
| संवत्– १९४८ | सूर्य:वृषभ |
| संवत्सर – पराभवनाम | चन्द्र:तुला |
| अयन– उत्तरायणारंभ | हिजरी सन् – १४४६ |
| मास– अधिक ज्येष्ठ | मुस्लिम मास – जिल्हेज |
| ऋतु– सौर ग्रीष्म | तारीख – १२ |
| शुक्ल पक्ष | |

## दै. ‘संध्या’धमाल सूडोकु क्र. ९६३

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | | | | | 9 | | 7 | |
| | 9 | 7 | 6 | 8 | 1 | | 2 | |
| 6 | 5 | 1 | | | | | 3 | |
| | | | | 1 | 6 | | 5 | |
| | | 6 | 7 | | 2 | 9 | | |
| | 1 | | 8 | 5 | | | | |
| | 7 | | | | | 5 | 8 | 1 |
| | 6 | | 1 | 7 | 8 | 3 | 9 | |
| | 8 | | 3 | | | | | 7 |

### : सूडोकु :

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ९६२ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | 4 | 1 | 3 | 7 | 8 | 6 | 2 | 5 |
| 2 | 6 | 5 | 9 | 1 | 4 | 8 | 3 | 7 |
| 7 | 8 | 3 | 5 | 2 | 6 | 4 | 9 | 1 |
| 6 | 2 | 4 | 1 | 9 | 3 | 7 | 5 | 8 |
| 5 | 1 | 9 | 2 | 8 | 7 | 3 | 6 | 4 |
| 3 | 7 | 8 | 6 | 4 | 5 | 2 | 1 | 9 |
| 8 | 5 | 2 | 4 | 3 | 1 | 9 | 7 | 6 |
| 4 | 3 | 6 | 7 | 5 | 9 | 1 | 8 | 2 |
| 1 | 9 | 7 | 8 | 6 | 2 | 5 | 4 | 3 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १९४२ – झेक स्वातंत्र्य सैनिकांनी टाकलेल्या बॉम्बमुळे राईन हार्ड हैड्रिचचा मृत्यू.
- १९७९ – बिशप एबल मुझोरेवा ऱ्होडेशियाचे पहिले कृष्णवर्णीय पंतप्रधान बनले. त्यांनी एक जूनला ऱ्होडेशियाचे नाव बदलून झिंबाब्वे केले.
- १९८५ – ब्रुसेल्स येथे फुटबॉल मैदानात प्रेक्षागाराची भिंत कोसळून ४१ ठार २५० जखमी. प्रेक्षकांच्या दंगलीमुळे ही भिंत कोसळली.

### राष्ट्रीय

- १९५८ – विनोबा भावे यांनी पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात प्रवेश केला.
- २००४ – ’सारस’ या संपूर्ण भारतीय बनावटीच्या प्रवासी विमानाची यशस्वी चाचणी.

### जन्म

- १८५९ – हिस्टेरिया विकासावर संशोधन करून त्याची कारणे शोधणाऱ्या पियर जेनेट या फ्रेंच मानसोपचार तज्ज्ञाचा जन्म.
- १९०२ – ब्रिटीश तंत्रज्ञ संशोधक सर लिओनार्ड जॉर्ज होल्डेन हक्सले यांचा जन्म.
- १९०३ – लेस्ली टाउन्स ’बॉब’ होपचा जन्म. त्याला पाच वेळा ऑस्करचा विशेष बहुमान देण्यात आला.
- १९०५ – किराणा घराण्याच्या प्रसिद्ध गायिका हिराबाई बडोदेकर यांचा जन्म.

### निधन

- १८२९ – सर हंफ्रे डेव्ही यांचे निधन.
- १९७२ – पृथ्वीराज कपूर, हिंदी चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ कलाकार यांचे निधन.
- १९८७ – चरण सिंग, लोकदलाचे संस्थापक,भारताचे माजी पंतप्रधान यांचे निधन.
- २००७ – स्नेहल भाटकर, ज्येष्ठ संगीतकार यांचे निधन.

## : SMS :

10% of road accidents are due to drunken driving. Which makes it a logical statement that 90% of accidents are due to driving without drinking!

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ४०.६ | २५.८ |
| अहमदनगर | ३८.९ | २५.२ |
| अकोला | ४५ | ३०.९ |
| अमरावती | ४४.३ | ३१.१ |
| बीड | ४७ | ३६ |
| भंडारा | ४५.६ | ३२.९ |
| बुलढाणा | ४२ | २४.८ |
| चंद्रपूर | ४६.८ | ३४.५ |
| चेन्नई | ४५.९ | ३३.६ |
| नवी दिल्ली | ४१.३ | २९.५ |
| धुळे | ४३.५ | २८.१ |
| गोंदिया | ४३.८ | ३२.३ |
| जळगाव | ४५.५ | २९.३ |
| कोल्हापूर | ३७ | २४.६ |
| लातूर | ४०.३ | २९.३ |
| मुंबई | ४१.५ | ३७.७ |
| नागपूर | ४५.२ | ३१.९ |
| नांदेड | ४३.७ | ३१.८ |
| नंदूरबार | ४०.५ | २६.२ |
| नाशिक | ३९.१ | २५.१ |
| पुणे | ३६.७ | २३.८ |
| पंढरपूर | ३९.७ | २९.१ |
| सातारा | ३८.१ | २४.५ |
| सांगली | ३९ | २५.१ |
| सोलापूर | ३९.४ | ३०.१ |
| वर्धा | ४६.७ | ३२.८ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग : काळा, अनुकूल दिशा : पश्चिम प्रकृती उत्तर राहिल. व्यापारातील बदलाने आपल्याला लाभ होईल.

**तूळ :** शुभ रंग : हिरवा, अनुकूल दिशा : दक्षिण आप्तांच्या सहकार्याने सफलता मिळेल. कार्यात आकस्मिक विघ्न येऊ शकते.

**वृषभ :** शुभ रंग : निळा, अनुकूल दिशा : दक्षिण आपली निर्माण झालेली समस्या सुटेल. कामाच्या ठिकाणी बढतीचे योग आहेत. मोठयांशी भेट होईल.

**वृश्चिक :** शुभ रंग : लाल, अनुकूल दिशा : पश्चिम मित्रांची भेट होईल. वैभव प्राप्त करणाऱ्या गोष्टीत मन रमेल. समस्या सुटतील.

**मिथून :** शुभ रंग : भूरकट, अनुकूल दिशा : उत्तर रागामुळे आपले नुकसान होईल. स्वजनांचा विरोध सहन करावा लागेल.

**धनू :** शुभ रंग : काळा, अनुकूल दिशा : पश्चिम घरगुती समस्येचा शेवट होईल. विचारात सकारात्मकता येईल. कामात लाभ होईल.

**कर्क :** शुभ रंग : जाभंळा, अनुकूल दिशा : पश्चिम मन अशांत राहिल. उत्पन्नापेक्षा खर्च अधिक होईल. संपत्ति बाबत वाद होऊ शकतो.

**मकर :** शुभ रंग : निळा, अनुकूल दिशा : उत्तर व्यक्तिमत्वातील प्रभाव वाढेल. गुप्त चिंता निर्माण होऊ शकतात. सहकार्यापासून अनुकूलता राहिल.


**सिंह :** शुभ रंग : काळा, अनुकूल दिशा : पश्चिम घरगुती संकट निर्माण होऊ शकते. संपत्तीच्या कामात चांगला योग आहे.

**कुंभ :** शुभ रंग : काळा, अनुकूल दिशा : उत्तर शुभ वार्ता समजेल. प्रभावशाली लोकांच्या संपर्कात येताल. आर्थिक स्थिती उत्तम राहिल.

**कन्या :** शुभ रंग : जांभळा, अनुकूल दिशा : उत्तर उपजिविकेत योग्य परिणाम येतील. छातीच्या विकार जडण्याची शक्यता आहे.

**मीन :** शुभ रंग : पांढरा, अनुकूल दिशा : दक्षिण अंहकाराचा त्याग करा. सर्व कामे व्यवस्थित पार पाडतील. कारभार चांगला चालेल.

## ‘दै. संध्या’ जम्बो शब्दकोडे क्र. ९६३



### आडवे शब्द

१. न्याहरी, नाश्ता
४. हिंमतीची हद्द
७. एकदम योग्य
११. हरिवंशराय बच्चन याची प्रसिद्ध कविता– ‘लहरों से डरकर नौका पार नहीं होती, कोशिश करनेवालों की -- नहीं होती!
१२. ग्रामीण बोलीत गौर
१३. पावा
१४. शंभरी गाठणारा
१७. जोरात कोसळणे–ओतणे
१९. मोहिनी, अंमल
२१. खंडाने शेती करणारा
२२. पहारा
२४. काव्यात कोण
२५. वाकलेला
२६. वाल्याचा वाल्मिकी करणारा मंत्र
२७. झूल घेतलेला
२९. अनुतीर्ण
३१. पोहणे, तरंगणे
३२. गुलाबजामुनचा रस
३३. नेटका
३५. मनीमाऊचे वाघोबाशी नाते
३७. भानगड
३८. राजाची आई
३९. संभवमि युगेयुगे’चे आश्वासन देणारा अवतार
४२. च्या पुढे, च्या समक्ष
४४. शेतकऱ्याला दिलेले कर्ज
४५. विक्रमवीर सचिनचे वडील
४७. मासा
४९. माफी
५०. अलिप्त
५२. राबता, जाणे–येणे
५३. एकरूप, एकतान
५६. लोकहित
५७. श्रीयुत, श्रीमान
५९. किंमत
६१. मदनाची सहचरी
६२. यमनगरी
६३. घड्याळाचा आवाज
६५. अमंगल जाळण्याचा सण
६६. रसभंग, विचका
६८. तलवारीचे घर
७०. अंत:करण
७२. रामचरित मानस लिहिणारे
७४. खास
अ.नगरकडील
७६. संगोपन– --- पोषण
७७. आश्चर्य
७९. जोरदार
८०. सुबक, कोरून काढलेला
८१. शिवशाहीतील प्रमुख शस्त्र

### उभे शब्द

१. दुश्चिन्ह
२. पापणी (हिंदी)
३. शुष्कता
४. शक्तीमान, पराक्रमी
५. त्वरेने, वेगाने
७. खवलेले खोबरे
८. दूरदेश
९. लुच्चा, खोटा
१०. लहानसहान
१५. शिव्याशाप
१६. लढतना आलेले मरण
१८. जर्दाळूचे बी
२०. पैंजणांचा नाजूक आवाज
२३. बळीला पाताळात गाडणारा
२४. उणीव
२६. धान्याचा ढीग
२८. कपाळ फुटणे
३०. च्या जवळ
३२. दररोजचा, परिपाठातला
३४. निष्णात, वाकबगार
३५. आईचा भाऊ
३६. तहान
३७. द्राक्षाचा वा मोत्यांचा आणि फुलांचाही
३९. अशक्त, बारीक
४०. निरूपयोगी भटकंती
४१. पत्त्यातील पाच–तीन–दोन
४३. श्रीविष्णू
४६. कष्टाळू
४८. मऊ
५१. रायगडवरील एक कडा
५२. प्रत्येक संसारी माणसाची अवस्था याच्याप्रमाणे असते!
५४. तृष्णा
५५. नवऱ्याचा भाऊ
५६. चकचकीत, --- बरक
५८. लज्जित, वरमलेला
५९. मध्यंतरी
६०. गर्दी
६१अ. पण
६५. शिवकालीन नाणे
६७. जहाज
६९. रोकड
७१. प्रहार, वार
७३. वारा
७५. कागदाचे परिमाण
७७. नूतन
७८. संघर्ष, प्रतिकार

### जम्बो शब्दकोडे क्र. ९६२ चे उत्तर

आडवे उत्तर १.अलीबाबा आणि चाळीस चोर ८.अंक ९.यच्चयावत ११.करदाता १२.भारत १३.मन १६.अनादिअनंत १८.घरधनी २०.दरदाम २१.खसखस २३.बैलपोळा २५.खडा २६.वासा २७.रड २८.मालक २९.समाधान ३१.काळीज ३२.वासर ३४.पायलट ३५.मरगळ ३७.जाणे ३८.कदम ४०.राघव ४१.परत परत ४३.धबधबा ४४.टक ४६.जड ४७.अनावर ४८.ईश ४९.नव ५०.रपाटा ५३.पाटी ५४.कळस ५६.अनार ५८.हातोडी ६०.मासा ६१.कपार ६३.कातकरी ६५.नारद ६७.न्यायालय ६८.पोर ६९.मसलत ७०.याचना

उभे उत्तर : १.अलीकडे २.बारदान ३.आई ४.चाकरमानी ५.सदा ६.रयनदिवस ७.छाया ८.अंत १०.वरात १३.मना १४.कानाडोळा करणे १५.मोर १६.अवसर १६अ.नंदीबैल १७.कोरडा १८.घमघमाट १९.धनवान २०.दखलपात्र २२.खडकाळ २४.लकवा २८.माज २९.सलवार ३०.शरम ३३.सजावट ३५.मदत ३६.मीराबाई ३८.करगोटा ३९.अंबर ४१.पडवळ ४२.तयार ४३.धवल ४५.कसोटी सामना ४६.जनककन्या ४७.अतोनात ५१.पाचर ५२.अतोनात ५३.पामा ५५.सकल ५६.अकार ५७.रकम ६२.पाय ६४.रीस ६६.दया

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily “Sandhya” News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### गंगा माई की बेटियाँमधील सिद्धू-स्नेहाला पुन्हा एकत्र आणण्याची चाहत्यांची मागणी

पुणे (दैनिक संध्या) : झी वाहिनीवरील 'गंगा माई की बेटियाँ' या मालिकेने अल्पावधीतच प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवले आहे. भावनिक कथानक, नात्यांतील गुंतागुंत आणि कलाकारांचा प्रभावी अभिनय यामुळे ही मालिका सातत्याने चर्चेत राहिली असून प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळवत आहे. विशेष म्हणजे मालिकेतील सिद्धू आणि स्नेहा या जोडीच्या विभक्त होण्याच्या कथानकामुळे चाहत्यांमध्ये प्रचंड नाराजी आणि भावनिक प्रतिक्रिया उमटताना दिसत आहेत. सध्या मालिकेत सिद्धूचे पूर्वीसोबत लग्न ठरत असल्याचे दाखवण्यात येत आहे, तर स्नेहा शंतनूसोबत आयुष्याची नवी सुरुवात करण्याच्या तयारीत आहे. त्यामुळे प्रेक्षकांना ही लोकप्रिय जोडी कायमची वेगळी होणार का, अशी भीती सतावत आहे. पडद्यावर सुरू असलेल्या विवाहपूर्व सोहळ्यांइतकाच सोशल माध्यमांवरही चाहत्यांचा उत्साह आणि अस्वस्थता पाहायला मिळत आहे. अमनदीप सिधू म्हणाली, "प्रेक्षकांनी सिद्धू आणि स्नेहावर केलेले प्रेम पाहून मी मनापासून भावुक झाले आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात चाहते या व्यक्तिरेखांसाठी एकत्र येत आहेत, ही आमच्यासाठी खूप मोठी गोष्ट आहे. त्यांच्या भावना आणि पाठिंब्यामुळे आम्हाला अधिक चांगले काम करण्याची प्रेरणा मिळते. पुढे कथेला कोणते वळण मिळेल हे सर्जनशील चमू ठरवेल, पण प्रेक्षकांची ही उत्सुकता आम्हालाही तितकीच आनंद देणारी आहे." तर शिझान खान म्हणाला, "चाहत्यांकडून मिळणारे प्रेम खरोखरच अविस्मरणीय आहे. सिद्धू आणि स्नेहाच्या नात्याशी प्रेक्षक इतके जोडले गेले आहेत, हे पाहून कलाकार म्हणून मोठा आनंद वाटतो. त्यांच्या भवितव्याबद्दल चाहत्यांइतकीच उत्सुकता मलाही आहे. पुढे काय घडेल हे पाहणे रंजक ठरणार आहे."आता या मोहिमेला मिळणारा वाढता प्रतिसाद पाहता निर्माते आणि वाहिनी प्रेक्षकांच्या भावनांचा आदर करत सिद्धू आणि स्नेहाला पुन्हा एकत्र आणणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. पाहायला विसरू नका 'गंगा माई की बेटियाँ' ही मालिका दररोज रात्री ९ वाजता झी वाहिनीवर.



### 'दगडूशेठ' गणपती मंदिरात अधिक मासानिमित्त 'चतुर्वेद स्वाहाकार'

■ श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट तर्फे वेदमूर्ती नटराज शास्त्री यांच्या पौरोहित्याखाली आयोजन

पुणे (दैनिक संध्या) : ब्रह्मणस्पती सूक्त होम, ऋग्वेद संहिता स्वाहाकार, कृष्ण यजुर्वेद स्वाहाकार, सामवेद स्वाहाकार, अथर्ववेद स्वाहाकाराचे आयोजन 'दगडूशेठ' गणपती मंदिरात करण्यात आले. अधिक मास अर्थात ढुंढिराज मासाच्या निमित्ताने मंदिरात 'चतुर्वेद स्वाहाकार' संपन्न होत आहे. श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट तर्फे आयोजित 'चतुर्वेद स्वाहाकार' अंतर्गत ब्रह्मणस्पती सूक्त होम शुभारंभ ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने व संगीता रासने यांच्या हस्ते झाला होता. वेदमूर्ती नटराज शास्त्री यांच्या पौरोहित्याखाली दररोज दुपारी १ ते सायं. ७ दरम्यान मंदिरात 'चतुर्वेद स्वाहाकार' सुरु आहे. रविवार, दि. ३१ मे रोजी धुंडीविनायक पौर्णिमेला पूर्णआहुती, महाआरती व सांगता होणार आहे. गाणपत्य संप्रदायामध्ये ज्योतिष शास्त्राशी संबंधित भगवान गणेशांचा अवतार म्हणजे श्री ढुंढिराज अवतार. महाराजा दिवोदास नामक राजाच्या उद्धारासाठी झालेला आणि भगवान श्री शंकरांच्या द्वारे पूजन संपन्न झालेला हा दिव्य अवतार. आजही काशी क्षेत्रामध्ये भगवान श्री विश्वनाथ यांच्या मंदिरासमोर त्यांनी पूजन केलेले भगवान ढुंढिराज विद्यमान आहेत. विश्वनाथाच्या दर्शनाच्या आरंभी त्यांच्या दर्शनाची, वंदनाची परंपरा आहे. त्यांच्या उपासनेचे विशेष महत्व असल्याने या महिन्याला गाणपत्य संप्रदायात ढुंढिराज मास म्हणतात. या काळात श्री गणेश विग्रहाची पूजा, श्री गणेशाना दुर्वार्चन, गणेश ग्रंथाचे पारायण, गणेश मंत्र जप याला विशेष महत्व आहे. त्यामुळे मंदिरात 'चतुर्वेद स्वाहाकार' आयोजित करण्यात आला.





### अखिल म्हसोबा उत्सव मंडई ट्रस्ट तर्फे वृद्धांना मदतीचा हात

■ उद्योजक प्रकाशशेठ रसिकशेठ धारीवाल यांच्या विशेष सहकार्याने उपक्रम

पुणे (दैनिक संध्या) : अखिल म्हसोबा उत्सव मंडई ट्रस्ट, पुणे यांच्या वतीने वयोवृद्धांसाठी कार्यरत असणाऱ्या 'वृद्ध मित्र' संस्थेतील ज्येष्ठ नागरिकांना कंबरेचा बेल्ट, गरम पाण्याची बॅग, निकॅप, थ्री लेग वॉकिंग स्टिक आदी आवश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले. शनिपार चौकाजवळील स्व. रसिकशेठ माणिकचंद धारिवाल या ट्रस्टच्या नियोजित भवनात हा कार्यक्रम संपन्न झाला. ट्रस्टचे सहायक तथा माणिकचंद उद्योग समूहाचे चेअरमन प्रकाशशेठ रसिकशेठ धारीवाल यांच्या विशेष सहकार्याने ही मदत देण्यात आली. यावेळी प्रकाशशेठ रसिकशेठ धारीवाल, दिना धारीवाल आणि आदित्य धारीवाल यांच्या हस्ते साहित्याचे वाटप करण्यात आले. ट्रस्टचे विश्वस्त अध्यक्ष राहुल सुर्यवंशी आणि विश्वस्त उपाध्यक्ष निवृती जाधव यावेळी उपस्थित होते. निवृती जाधव म्हणाले, समाजातील गरजू घटकांना मदतीचा हात देत वृद्धांचे रोजचे जगणे सोपे करण्यासाठी आमच्याकडून ही मदत करण्यात आली. धार्मिक कार्यासोबत सामाजिक उत्तरदायित्व जपत ट्रस्ट सातत्याने विधायक उपक्रम राबवत आहे. यासाठी माणिकचंद उद्योग समूहाने कार्यकर्त्यांवर विश्वास ठेवून सातत्याने मदत केली आहे.

# नेहरूंचा जगात नैतिक दबदबा : डॉ. भालचंद्र मुणगेकर

पुणे (दै. संध्या)




'शीतयुद्धाच्या काळात जग अमेरिका आणि सेवियत युनियन या दोन देशात विभागलेले असताना स्वतंत्र परराष्ट्र धोरण आखून पं. जवाहरलाल नेहरूंनी तिसरी शक्ती निर्माण करण्याचा प्रयत्न केला. नेहरूंचा जगात नैतिक दबदबा होता,' असे प्रतिपादन ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ, मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू आणि माजी खासदार डॉ. भालचंद्र मुणगेकर यांनी बुधवारी केले. 'आजचा भारत हतबल झाला आहे. सध्याचे परराष्ट्र धोरण फसले असून मालदीवसारखा छोटा देशही आपले ऐकत नाही,' अशी टीका त्यांनी केली. महाराष्ट्र गांधी स्मारक निधी आणि युवक क्रांती दल यांच्या वतीने देशाचे पहिले पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांच्या पुण्यतिथीनिमित्त 'नेहरू प्रणित भारताच्या विकासाचे प्रतिमान आणि त्याची प्रसंगिकता' या विषयावर डॉ. मुणगेकर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. एस. एम. जोशी सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात ॲड. शंकर निकम लिखित 'भारताचा कोहिनूर' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. संस्थेचे महाराष्ट्र गांधी स्मारक निधीचे विश्वस्त सचिव अन्वर राजन, विश्वस्त डॉ. शिवाजीराव कदम, लक्ष्मीकांत देशमुख, एम.एस. जाधव, रमेश आढाव उपस्थित होते. महाराष्ट्र ज्ञान महामंडळाचे मार्गदर्शक डॉ. विवेक सावंत अध्यक्षस्थानी होते.

मुणगेकर म्हणाले, 'भारताला कोणत्या दिशेने पुढे न्यायचे, हे समजलेला एकमेव नेता नेहरू होते. राम मनोहर लोहियांमुळे काँग्रेस व नेहरूविरोधी दृष्टी तयार झाली होती. मात्र, संसदीय लोकशाही, आर्थिक नियोजन, धर्मनिरपेक्षता आणि परराष्ट्र धोरण ही नेहरूंची वैशिष्ट्ये आहेत. नेहरूंना लोकशाही समाजवाद आणायचा होता, अनेक अर्थतज्ज्ञांना वाटते. मात्र, त्यांना कल्याणकारी राज्य आणायचे होते. देशातील लोकांना एकत्र ठेवण्याची ताकद राज्य घटनेत आहे. पं. नेहरू, सरदार पटेल आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राज्य घटनेसाठी मोठे योगदान आहे. नेहरूंवर रशियन राज्यक्रांतीचा प्रभाव होता. भांडवलशाही अर्थव्यवस्था शोषण करणारी व्यवस्था आहे, असे त्यांचे मत होते. नेहरू राजकारणी झाले नसते तर ते तत्त्ववेत्ते किंवा इतिहासकार झाले असते. नेहरू आणि आइन्स्टाइन यांच्यात चर्चा होत असे. त्यावरून त्यांचा व्यासंग लक्षात येतो. नेहरूंचा प्रत्येक धर्मातील धर्मांधतेला विरोध होता. नेहरू सर्व मुख्यमंत्र्यांना पत्रे लिहायचे. विचारांची आदानप्रदान होत होती. नेहरूंनी देशात ११७ संस्था उभ्या केल्या. देशाची बांधणी या संस्थांवर झाली आहे.'

'नेहरूमुक्त भारत करण्यासाठी मोदी सरकारने नियोजन आयोग बरखास्त केला आहे. इराण आणि इस्रायल युद्धात पाकिस्तान मध्यस्थी करतो आणि आपण अगतिकपणे पाहत बसतो, हे भूषणावह नाही,' अशी टीका मुणगेकर यांनी केली.

## अनु आणि आर्यला आशीर्वाद देण्यासाठी चाहत्यांना सेटवर येण्याचे आमंत्रण

पुणे (दै. संध्या)



झी टीव्हीवरील 'तुम से तुम तक' ही मालिका भारतीय टेलिव्हिजनवर एक आगळावेगळा आणि भावनिक क्षण निर्माण करण्यासाठी सज्ज आहे. या मालिकेमध्ये बेंगळुरूहून आलेल्या खऱ्या जोडप्यांना, त्यांच्या मुलींसह अनु आणि आर्यच्या भव्य लग्नसोहळ्याचा भाग बनण्याची संधी मिळणार आहे. हा क्षण आणखी खास बनवणारी गोष्ट म्हणजे या दोन्ही जोडप्यांची लग्नाची तारीख अनु आणि आर्यच्या लग्नाच्या तारखेशी जुळते, त्यामुळे त्यांच्यासाठी हा सोहळा खूपच वैयक्तिक आणि भावनिक ठरणार आहे. भावना आणि नातेसंबंधांवर आधारित कथा निर्माण करण्यासाठी मानल्या जाणाऱ्या 'आपका अपना' झी टीव्हीने या सोहळ्याला भव्य बनवण्याचा खास प्रयत्न केला आहे. त्यांनी या निष्ठावान प्रेक्षकांना मुंबईत आमंत्रित करून त्यांच्या आवडत्या ऑन-स्क्रीन जोडप्याच्या भव्य लग्नसोहळ्याचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधी दिली. अनु आणि आर्यच्या प्रेमकथेचे मोठे चाहते असलेल्या या कुटुंबांनी बेंगळुरूहून खास या उत्सवाचा भाग बनण्यासाठी प्रवास केला. सेटवरील भव्यता, सोहळ्यांची रंगत, आणि त्यात मिसळलेली उब, भावना व आनंद घेत या प्रत्येक क्षणाचा त्यांनी मनापासून आनंद लुटला.

## 'आयएमडीआर'ला पुणे मॅनेजमेंट असोसिएशनचा 'अकॅडमिक इन्स्टिट्यूट ऑफ द इयर' पुरस्कार




पुणे (दै. संध्या)

इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट डेव्हलपमेंट अँड रिसर्च (आयएमडीआर) संस्थेला 'अकॅडमिक इन्स्टिट्यूट ऑफ द इयर' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. पुणे मॅनेजमेंट असोसिएशनच्या (पीएमए) ४९ व्या स्थापन दिन कार्यक्रमात डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे विश्वस्त व 'आयएमडीआर'च्या व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष जगदीश कदम यांनी हा पुरस्कार स्वीकारला. प्रसंगी प्रा. डॉ. अभिजित शिवणे, प्रा. डॉ. सुरज कांबळे, प्रा. डॉ. सन्मथ शेट्टी, प्रा. डॉ. सोनाली खुरजेकर उपस्थित होते. व्यवस्थापन शिक्षण, शैक्षणिक उत्कृष्टता, उद्योग क्षेत्राशी असलेले दृढ संबंध, नवोपक्रम आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासातील संस्थेच्या दीर्घकालीन योगदानाची दखल घेत 'आयएमडीआर'ला या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. निवृत्त सनदी अधिकारी अविनाश धर्माधिकारी, पित्ती उद्योग समूहाचे व्यवस्थापकीय संचालक आदित्य पित्ती, पूना ॲंब्रेसिव्हजचे संस्थापक व अध्यक्ष वीरेंद्र सूद, बँक ऑफ महाराष्ट्रचे संचालक प्रसेनजीत फडणवीस यांनी कार्यक्रमात 'विकसित भारत' संकल्पनेवर मार्गदर्शन केले. 'पीएमए'चे अध्यक्ष बाळ पाटील, उपाध्यक्ष प्रदिप तुपे व राहुल जोशी उपस्थित होते. 'आयएमडीआर'सह द इंडस आंत्रप्रेन्युअर्स, स्वरूपवर्धिनी, महाट्रेनर्स या संस्थांचा, तसेच प्रशांत बोरा, श्वेता शालिनी, गौरव त्रिपाठी यांचा गौरव करण्यात आला.

या पुरस्काराबद्दल आनंद व्यक्त करीत जगदीश कदम म्हणाले, "व्यवस्थापन क्षेत्रात गेल्या ५२ वर्षांपासून 'आयएमडीआर' करीत असलेल्या उल्लेखनीय कार्याचा हा गौरव आहे. 'पीएमए'सारख्या प्रतिष्ठित व्यासपीठावर हा सन्मान मिळणे म्हणजे उद्योगसंबंधित शिक्षण, नवोपक्रमाधिष्ठित अध्यापन, संशोधनाभिमुख दृष्टीकोन आणि मूल्याधिष्ठित नेतृत्व विकासाच्या माध्यमातून भविष्यासाठी सक्षम व्यवस्थापक घडविण्याच्या 'आयएमडीआर'च्या सातत्यपूर्ण प्रयत्नांची पावती आहे. या गौरवामुळे भारतातील अग्रगण्य स्वायत्त व्यवस्थापन संस्थांमध्ये 'आयएमडीआर'चे स्थान अधिक भक्कम झाले आहे."

## अग्रगण्य व्हीएफएक्स स्टुडिओ फिल्मसीजीआयची व्हीएएम आणि स्क्रीन अवॉर्ड्समध्ये मोठी झेप

### 'धुरंधर चित्रपटासाठी दिले १००० पेक्षा जास्त शॉट्स

पुणे (दै. संध्या)

पुणे-स्थित व्हीएफएक्स स्टुडिओ फिल्मसीजीआय या भारतातील अग्रगण्य ॲनिमेशन व व्हिज्युअल इफेक्ट्स स्टुडिओ आणि टीपीएन गोल्ड-प्रमाणित कंपनीने 'धुरंधर आणि 'धुरंधर: द रिव्हेंज या चित्रपटांचे व्हिज्युअल जग साकारण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. या चित्रपटांसाठी स्टुडिओने 1000 हून अधिक उत्कृष्ट व्हीएफएक्स शॉट्स दिले आहेत. जिगरा, सीटीआरएल, क्वॉला, स्ट्रेंजर थिंग्ज, सेक्रेड गेम्स, पठाण, कल्की, जुबली आणि ऑस्करसाठी नामांकित झालेल्या होमबाउंड यांसारख्या गाजलेल्या कलाकृतींमधील कामासाठी ओळखली जाणारी फिल्मसीजीआय कंपनी कथेला पूरक ठरणाऱ्या व्हिज्युअल कथानकाच्या मर्यादांना दूर करत आहे.

स्टुडिओच्या या सर्जनशील उत्कृष्टतेची दखल उद्योग जगतानेही घेतली आहे, जिथे 2026 च्या पुरस्कार सोहळ्यांमध्ये फिल्मसीजीआयने मोठे यश संपादन केले आहे. कंपनीने झी सिने अवॉर्ड्स 2026 मध्ये बेस्ट व्हीएफएक्स, स्क्रीन अवॉर्ड्स 2026 मध्ये बेस्ट स्पेशल इफेक्ट्सचे पुरस्कार जिंकले आहेत. यासोबतच प्रतिष्ठित व्हीएएम अवॉर्ड्समध्येही त्यांच्या कामाचा गौरव करण्यात आला आहे, यामुळे सिनेमा जगतातील व्हिज्युअल इफेक्ट्स क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी म्हणून त्यांचे स्थान अधिक दृढ झाले आहे. यापूर्वी, स्टुडिओला जुबली मालिकेतील कामासाठी फिल्मफेअर ओटीटी अवॉर्ड फॉर बेस्ट व्हीएफएक्स (सिरीज) पुरस्कार मिळाला होता, तर दिल्ली सफारी चित्रपटाला नॅशनल अवॉर्ड फॉर बेस्ट ॲनिमेटेड फिल्म पुरस्कार मिळाला होता.

'धुरंधर आणि 'धुरंधर: द रिव्हेंज या चित्रपटांच्या निर्मितीदरम्यान, फिल्मसीजीआयने संकल्पनेपासून ते अंतिम वितरणापर्यंत बी62 स्टुडिओच्या मुख्य क्रिएटिव्ह टीमसोबत अत्यंत जवळून काम केले. यामध्ये व्हिज्युअल इफेक्ट्स कुठेही कृत्रिम न वाटता नैसर्गिक आणि अदृश्य राहतील यावर प्रामुख्याने भर देण्यात आला होता. कथेला प्राधान्य देणारा दृष्टिकोन स्वीकारत स्टुडिओने केवळ भव्यता दाखवण्याऐवजी दृश्ये वास्तववादी आणि सलग दिसण्याला प्राधान्य दिले, ज्यामुळे हे इफेक्ट्स कथेला पूरक ठरतील आणि प्रेक्षकांना ते खरे वाटतील.

यातील एक उत्कृष्ट उदाहरण म्हणजे 'ल्यारी सेट, जिथे दृश्याचा विस्तार आणि पोत हे कथा सांगण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे होते. स्टुडिओने सविस्तर वर्ल्ड-बिल्डिंग, सेट ऑग्मेंटेशन आणि प्रगत कॉम्पोझिटिंगच्या माध्यमातून या वातावरणाचा विस्तार केला आणि अधिक प्रभावी बनवले. यामुळे पडद्यावर एक गजबजलेले आणि वास्तविक वातावरण तयार झाले, जे प्रेक्षकांना पूर्णपणे वास्तववादी वाटते आणि त्यात ग्राफिक्सचा वापर केला आहे हे ओळखता येत नाही. यातील बरेचसे काम मूळ लाइव्ह-ॲक्शन सीन्सशी तंतोतंत जुळवणे आवश्यक होते, ज्यासाठी हे वातावरण नैसर्गिक आणि सुसंगत वाटेल याची खात्री करण्यासाठी प्रत्येक फ्रेमच्या पातळीवर अचूकता राखली गेली.




फिल्मसीजीआय आपल्या सर्जनशील आणि तांत्रिक क्षमतांचा विस्तार करत असताना विनासायास आणि कथेवर आधारित व्हिज्युअल अनुभव तयार करण्यावर स्टुडिओचा भर कायम आहे; जे भारत आणि जागतिक बाजारपेठेतील सिनेमॅटिक कथानकाच्या भविष्याला नवा आकार देत आहेत.

## 'विश्वविक्रमी शिवछत्रपती' विषयावर विशेष व्याख्यान रविवारी (दि.३१)

■ इतिहास प्रेमी मंडळ आणि भारतीय इतिहास संकलन समितीतर्फे आयोजन

■ गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड व युनेस्को करिता पाठविलेल्या निवेदनाचे विस्तृत विवेचन ऐकण्याची संधी

पुणे (दै. संध्या)

इतिहास प्रेमी मंडळ आणि भारतीय इतिहास संकलन समितीच्या वतीने रविवार, दिनांक ३१ मे २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता पेरूगेट भावे हायस्कूलचे सभागृह, सदाशिव पेठ, पुणे येथे 'दुर्ग दिन' निमित्त इतिहास संशोधक प्रवीण भोसले यांचे 'विश्वविक्रमी शिवछत्रपती' या विषयावर स्लाईड शो व व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. सांगली येथील प्रसिद्ध इतिहास संशोधक आणि अभियंता असणारे प्रवीण भोसले यांनी मध्ययुगीन जगातील राजांनी केलेल्या दुर्ग बांधणी चा अभ्यास केला.आणि त्यांच्या हे लक्षात आले की जलदुर्ग स्थापत्यामधे छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य अतुलनीय आहे.इतकेच नाही तर शिवाजी महाराजांच्या नावावर एकदोन नाही तर चार विश्वविक्रम नोंदवले जाऊ शकतात. भोसले यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून जगातील व शिवरायांच्या स्वराज्यातील जलदुर्गांचा तौलनिक अभ्यास केला.आपले अभ्यासपूर्ण निवेदन गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड व युनेस्को कडे पाठवले. हे विस्तृत विवेचन ऐकण्याची संधी यानिमित्ताने पुणेकरांना मिळणार आहे. प्रख्यात कादंबरीकार व दुर्गमहर्षी गो. नी. दांडेकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त मागील २६ वर्षे इतिहास प्रेमी मंडळाच्या वतीने 'दुर्ग दिन' साजरा केला जात आहे. दुर्ग भ्रमंती आणि लेखन क्षेत्रातील त्यांच्या भरीव योगदानामुळे त्यांना दुर्गमहर्षी म्हणून ओळखले जाते. छत्रपती शिवाजी महाराजांनी जलदुर्ग स्थापत्यामध्ये केलेल्या अद्वितीय कार्याची जागतिक स्तरावर नोंद व्हावी, तसेच गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये त्यांच्या कार्याचा समावेश व्हावा यासाठी प्रवीण भोसले यांनी पुढाकार घेतला आहे. या विषयावरील संशोधन, ऐतिहासिक संदर्भ आणि दृश्य माध्यमांद्वारे सादर होणारा हा कार्यक्रम इतिहासप्रेमींसाठी विशेष ठरणार आहे. हा कार्यक्रम विनामूल्य खुला असून पुणेकरांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहनही मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# ध्वनीक्षमतेसह नवे स्मार्ट ध्वनीउपकरण 'इको डॉट मॅक्स' आणि 'इको स्टुडिओ लॉन्च

पुणे (दै. संध्या)



ई-कॉमर्स क्षेत्रातील आघाडीची कंपनी अमेझॉनने भारतीय बाजारपेठेत अत्याधुनिक ध्वनीअनुभव देणारी दोन नवी स्मार्ट ध्वनीउपकरणे सादर केली आहेत. 'इको डॉट मॅक्स' आणि 'इको स्टुडिओ' अशी या उपकरणांची नावे असून आधुनिक रचना, अधिक प्रभावी ध्वनी आणि स्मार्ट गृहव्यवस्थापन सुविधा यामुळे ही उपकरणे ग्राहकांचे लक्ष वेधून घेत आहेत. कंपनीच्या माहितीनुसार, 'इको डॉट मॅक्स' हे आतापर्यंतचे सर्वात सक्षम 'इको डॉट' उपकरण असून यामध्ये मागील पिढीच्या तुलनेत जवळपास तिप्पट अधिक घनगंभीर ध्वनीक्षमता देण्यात आली आहे. तसेच या श्रेणीमध्ये प्रथमच दुहेरी ध्वनीप्रणालीचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे लहान आकार असूनही संपूर्ण खोलीभर प्रभावी ध्वनीअनुभव मिळणार आहे.

दुसरीकडे, 'इको स्टुडिओ'मध्ये वातावरणाशी सुसंगत ध्वनीतंत्रज्ञान देण्यात आले असून विशेष ध्वनीअनुभवासाठी आधुनिक प्रणालीचा वापर करण्यात आला आहे. नव्या संक्षिप्त रचनेसह हे उपकरण आकर्षक स्वरूपात सादर करण्यात आले आहे. ही दोन्ही उपकरणे वेगवान कार्यक्षमतेसाठी अमेझॉनच्या विशेष तंत्रचिपवर आधारित असून स्मार्ट गृहव्यवस्थापन अधिक सक्षम करण्यासाठी अत्याधुनिक संवेदनतंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. याच्या मदतीने घरातील उपस्थिती, हालचाल आणि तापमान ओळखून स्वयंचलित सुविधा कार्यान्वित होऊ शकतात.

या उपकरणांमध्ये अंगभूत 'अलेक्सा' सुविधा देण्यात आली आहे. त्यामुळे वापरकर्त्यांना केवळ आवाजाद्वारे गाणी ऐकणे, दिवे किंवा वातानुकूलन यंत्रणा नियंत्रित करणे, वेळेची आठवण ठेवणे, हवामानाची माहिती घेणे किंवा खरेदीसूची तयार करणे शक्य होणार आहे.

अमेझॉन इंडियाच्या ध्वनीउपकरण आणि स्मार्ट गृह विभाग प्रमुख मालविका जेठवानी म्हणाल्या, "भारतीय ग्राहकांसाठी अधिक सक्षम आणि उच्च दर्जाचा ध्वनीअनुभव उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने ही उपकरणे सादर करण्यात आली आहेत. आजची स्मार्ट उपकरणे केवळ मनोरंजनापुरती मर्यादित राहिलेली नाहीत, तर ती घरातील दैनंदिन कामांची महत्त्वाची सहाय्यक बनत आहेत."

संगीतप्रेमींसाठी या उपकरणांद्वारे विविध संगीत आणि ध्वनीसेवा सहज उपलब्ध होणार असून घरगुती मनोरंजनाचा अनुभव अधिक समृद्ध करण्यावर कंपनीचा भर आहे. याशिवाय स्मार्ट गृहव्यवस्थापनासाठी विविध उपकरणांशी जोडणीची सुविधाही देण्यात आली आहे. 'इको डॉट मॅक्स' हे उपकरण १० हजार ९९९ रुपयांना, तर 'इको स्टुडिओ' २३ हजार ९९९ रुपयांना उपलब्ध करण्यात आले आहे. ही दोन्ही उपकरणे अमेझॉनच्या संकेतस्थळासह इतर प्रमुख ऑनलाइन विक्री माध्यमांवर विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

दरम्यान, आगामी सणासुदीच्या पार्श्वभूमीवर स्मार्ट गृहउपकरणांच्या बाजारपेठेत वाढती स्पर्धा पाहायला मिळत असून अमेझॉनच्या या नव्या सादरीकरणामुळे प्रीमियम ध्वनीउपकरण विभागात नवी चुरस निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### अजगराला सर्पमित्राकडून जीवदान; उकाड्यामुळे वन्यजीव मानवी वस्तीत

चिरनेर (दैनिक संध्या) : चिरनेर मुळपाडा येथील अरुण काशिनाथ मुंबईकर यांच्या घराजवळ ठेवण्यात आलेल्या पत्राच्या अडगळीत भर दुपारच्या वेळेत गारव्याच्या शोधात आलेला साधारणता: नऊ ते दहा फूट लांबीचा भला मोठा अजगर मंगळवारी (दि. 26) आढळून आल्याने, अरुण मुंबईकर यांच्या पत्नी कमल मुंबईकर या एकट्याच घरात असल्यामुळे घाबरून गेल्या. मात्र प्रसंगावधन राखत, त्यांनी मुलगा प्रतीक मुंबईकर याला मोबाईलद्वारे अजगराचा वावर असल्याची माहिती दिली. प्रतीक मुंबईकर यांनी स्थानिक सर्पमित्र जयवंत ठाकूर यांच्याशी संपर्क साधून, घराजवळ अजगर असल्याची माहिती दिली. माहितीnew मिळताच, सर्पमित्र जयवंत ठाकूर यांनी घटनास्थळ गाठले. आणि गारव्याच्या शोधात आलेल्या अजगराला मोठ्या शिताफीने पकडून जीवदान दिले. मानवी वस्तीत उकाड्यामुळे वन्यजीव शिरकाव करू लागले आहेत. त्यामुळे साधारणतः 9 ते 10 फूट लांबीचा हा अजगर दुपारच्या भर उन्हाच्या वेळी गारव्याच्या शोधात आला असावा. मात्र कोणाला इजा होण्या आधीच सर्पमित्र जयवंत ठाकूर यांनी या अजगराला काळजीपूर्वक पकडून त्याला जीवदान दिले. त्यानंतर त्याला उरण तालुका वनविभागाच्या निर्देशानुसार सुरक्षित वनक्षेत्रात सोडून दिले.

### राष्ट्रीय तायक्वांन्डो स्पर्धेसाठी रायगडचे सुभाष पाटील यांची स्पर्धा प्रमुख म्हणून निवड



उरण (दैनिक संध्या) : इंटरनॅशनल इनडोअर स्टेडियम हल्दवानी नैनिताल येथे उत्तराखंड तायकवांडो असोसिएशन व तायकवांडो फेडरेशन ऑफ इंडिया आयोजित ओपन राष्ट्रीय तायक्वॅन्डो स्पर्धा २९ ते ३१ मे २०२६ रोजी होणाऱ्या स्पर्धेसाठी रायगडचे सुपुत्र तायकवोंडोचे आंतरराष्ट्रीय पंच व ७ वी डिग्री ब्लॅक बेल्ट यांची यांची तायकवोंडो खेळात निस्वार्थी तायकवोंडो राष्ट्रीय स्पर्धे साठी स्पर्धा प्रमुख म्हणुन निवड झाली आहे तसेच रायगडचे सुपुत्र सुभाष पाटील यांची तायक्वांदो खेळात निस्वार्थीपणे पंच प्रशिक्षक म्हणुन देशात व परदेशात आतापर्यंत करत आलेल्या उल्लेखनीय कामगीरी ची दखल घेत व त्यांच्या अनुभवाचा फायदा खेळाडू, प्रशिक्षक व पंच यांना व्हावा व भविष्यात देशातुन उत्कृष्ट पंच प्रशिक्षक व खेळाडू तयार होतील म्हणून देशातील या खेळाची अधीकृत शिखर संघटना तायक्वांदो फेडरेशन ऑफ इंडिया च्या पदाधिकाऱ्यांनी सुभाष पाटील यांची हल्दवानी नैनिताल येथे होणाऱ्या राष्ट्रीय तायकवोंडो स्पर्धा प्रमुख पदी नेमणुक केली आहे. राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल रायगड तायक्वांदो असोसिएसन, तायक्वांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र (मुंबई) से पदाधिकारी / प्रशिक्षक व तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### शिक्षणाधिकारी श्री. कारेकर यांच्या तक्रारी बदलीसाठी शिक्षक सेना आक्रमक

पिंपरी (दैनिक संध्या) : माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी भाऊसाहेब कारेकर यांनी जानेवारी २०२४ ते अजातागायत प्रशासकीय कामकाजात अनेक गंभीर अनियमितता केली आहे. यामुळे कारेकर यांची तत्काळ बदली करावी. अशी तक्रार मागणी शिक्षक सेनेचे प्रदेश उपाध्यक्ष संभाजी शिरसाट यांनी शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्याकडे केली आहे. या तक्रारीनुसार संबंधित तक्रारीची गंभीर दखल घेवून श्री कारेकर यांची सखोल चौकशी करून त्यांचा शिस्तभंग विषय कारवाईचा प्रस्ताव शासनास सादरकरण्याचे निर्देश दिले आहे. शिरसाट यांच्या तक्रारीनुसार कारेकर यांनी शिक्षक समायोजन, बदली मान्यता,अनुकंपा मान्यता व इतर अनेक प्रशासकीय बाबी दफ्तर दिरंगाई करून भ्रष्टाचार करण्यासाठी पुणे जिल्हातील शाळा,व शिक्षकांना वेठीस धरून भ्रष्टाचार केला. डिसेंबर २५ मध्ये राज्याचे माजी विरोधी पक्षनेते विजय वाडेट्टीवार यांनी शिक्षण आयुक्तांकडे कारेकर यांच्या कामकाजाबाबतीत गंभीर तक्रार केली असून अंदाजे २५० पेक्षा अधिक अनियमितता केला आहे. यासाठी कारेकर यांनी लाखो रुपये स्वीकारल्याचा आरोप वाडेट्टीवार यांनी निवेदनाद्वारे आरोप करून निलंबनाची कारवाई करावी अशी मागणी करणारे पत्र दिले होते. तक्रारीत्यानुसार कारेकर यांच्या अनियमित कामकाजाची चौकशी शिक्षण उप संचालक डॉ सुचिता पाटेकर या करीत आहे.


### जाहीर नोटीस

गाव मौजे नारायणगाव, ता.जुन्नर, जि.पुणे व परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

खालील वर्णन केलेली मिळकत ही श्री.राहुल मारुती शेटे, श्री.राजेश मारुती शेटे, सौ. स्वाती विजय शिंदे. यांचे सामाईक मालकीहक्क, ताबेवहीवाटीची आहे. सदर मिळकत आमचे अशिल यांना खरेदी करावयाची आहे. त्याबाबत आमचे अशीलांनी संबधीत व्यक्तींशी व्यवहाराची बोलणी केलेली असून, त्याबाबतची इसार रक्कमही दिलेली असून, रजि. खरेदीखत करणार आहेत. त्यामुळे भविष्यात कोणाता ही वाद निर्माण होऊ नये म्हणुन, सदरची नोटीस प्रसिद्धीसाठी दिलेली आहे.

तरी खाली नमूद केलेल्या मिळकतीवर कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध म्हणजेच गहाण, दान, लिज, बक्षिस, खरेदी-विक्री, साठेखत, लिज-लिन, चोळी बांगडी, वाटप, पोटगी, रिझव्हेशन,रस्ता, वहिवाट, व इतर वारसा हक्क इत्यादी स्वरूपाचे वा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून आठ दिवसांत खालील पत्यावर योग्य त्या सबळ पुराव्यानिशी संपर्क साधावा. व तशी खात्री करून द्यावी. अन्यथा सदरची मिळकत निर्वेध व निजोखमी आहे असे समजून, सदरील मिळकतीवर इतर कोणाचाही, कसल्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध नाही, व असल्यास त्यांनी तो जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे, असे समजून आमचे आशिल सदर मिळकती संदर्भातील व्यवहार पूर्ण करतील. मग मात्र कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार चालणार नाही. याची नोंद घ्यावी. म्हणून सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध केली असे.

मिळकतीचे वर्णन –तुकडी व जि.प.पुणे पोट तुकडी ता.जुन्नर, मे. दुय्यम निबंधक सो.नारायणगाव यांचे कार्यक्षेत्रातील गाव मौजे नारायणगाव, ता.जुन्नर, जि.पुणे हद्दीतील सामाईक खाते नं. 5175 वरील शेतजमीन गट नं.440/3 क्षेत्र 0.19.50 आर आकार 0.57 सामाईकातील अविभक्त हिश्याचे क्षेत्रापैकी पूर्व बाजूकडील 0.13.50 आर, यासी चतु:सिमा– पूर्व– अंतर्गत रस्ता, पश्चिम– पुणे-नाशिक हायवे, दक्षिण- गट नं. 440/4, उत्तर – गट नं. 440/2 येणेप्रमाणे मिळकतीचे चतु:सिमापूर्वक वर्णन असे.

**येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.**
**दि.28/05/2026**

**ॲड. भाग्यश्री बाबाजी शिंदे**
**श्रीकृष्णप्लाझा, आळेकर मार्केट**
**नारायणगाव ता. जुन्नर, जि. पुणे.**
**मो. नं 9960186361**


# ‘विस्मा’च्यावतीने साखर व जैवऊर्जेवरील परिषदेचे पुण्यात आयोजन




**पुणे (दै. संध्या) :** वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशन (विस्मा) यांच्यावतीने येत्या शनिवारी (३० मे) पुणे येथे साखर आणि जैव ऊर्जा (बायोएनर्जी) या विषयावर भव्य परिषदेचे आयोजन करण्यात आले असून यावेळी विशेष उल्लेखनीय काम केलेल्या साखर कारखान्यांना पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. या परिषदेचे उद्घाटन राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे, केंद्रीय रस्ते व वाहतूक मंत्री नितीन गडकरी आणि राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते होणार असून केंद्रीय साखर सहसचिव अश्विनी श्रीवास्तव व राज्याचे साखर आयुक्त डॉ. संजय कोलते हे परिषदेमध्ये सहभागी होणार असल्याची माहिती आज विस्माचे महासचिव पांडुरंग राऊत, खजिनदार महेश देशमुख, संचालक रोहित नरा आणि कार्यकारी संचालक अजित चौगुले यांनी आज येथे पत्रकार परिषदेत दिली. यावेळी राऊत यांनी सांगितले की, शनिवारी होत असलेल्या या परिषदेत साखरेबरोबरच व ऊसापासून तयार होणाऱ्या सहपदार्थांची निर्मिती, ग्रीन हायड्रोजनची आवश्यकता, हवाई इंधनावरील संशोधन, शेतकचऱ्यामधून जैव इंधन निर्मिती आणि कृत्रिम बुध्दीमत्ता तंत्रज्ञानाचा साखर कारखान्यांमधील उपयोग अशा विविध विषयांवर तज्ञांचे मार्गदर्शनपर चर्चासत्र होणार आहे. यंदाच्या साखर हंगामामध्ये राज्यातील खाजगी १०७ आणि सहकारी १०३ अशा एकूण २१० साखर कारखान्यांनी सुमारे १०३६ लाख टन ऊसाचे गाळप करुन ९८ लाख टन साखरेचे उत्पादन केले आहे. राज्यातील सुमारे ५५ टक्के साखर उत्पादन हे खाजगी कारखान्यांकडून होते. केंद्र शासनाकडे साखर निर्यातबंदी उठवण्यासंबंधी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कालच शिष्टमंडळासह केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांच्याशी चर्चा केली आहे. यावर सकारात्मक निर्णय लवकरच अपेक्षित आहे. विस्माच्या कार्यक्षेत्रातील महाराष्ट्र, गुजरात व गोवा येथील सुमारे १३९ खाजगी साखर कारखाने विस्माचे सदस्य आहेत. यामधील उत्कृष्ट काम करणाऱ्या साखर कारखान्यांना व त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना त्यांच्या कामगिरीच्या श्रेणीनुसार या परिषदेमध्ये विशेष पारितोषिके देऊन सन्मान करण्यात येणार आहे. यामध्ये दालमिया भारत शुगर (कोल्हापूर), जागृती शुगर (लातूर), नॅचरल शुगर (धाराशिव), श्रीनाथ म्हस्कोबा कारखाना (दौंड, पुणे), श्री गुरुदत्त शुगर (कोल्हापूर) आणि दौंड शुगर (पुणे) यांचा समावेश आहे. तर वरिष्ठ अधिकारी श्रेणीमध्ये सर्वश्री शहाजी गायकवाड (दौंड शुगर), संतोष कुंभार (दालमिया भारत शुगर), तुषार निघुते (वेंकटेश्वरा शुगर), वसंत शिंदे (केजीएस शुगर), बी. जी. चव्हाणके (जयवंत शुगर), शशिकांत निगुत (नॅचरल शुगर) आणि शिवाजी शिंदे (सिध्दी शुगर) यांना सन्मानित करण्यात येणार आहे.

## वाल्हेत बकरी ईद उत्साहात साजरी



**वाल्हे (दै. संध्या) :** ईश्वराप्रती अखंड निष्ठा तसेच त्याग व बलिदानाचा संदेश देणारी ईद –उल –अजहा अर्थात बकरी ईद वाल्हे ( ता. पुरंदर ) येथील मुस्लीम बांधवांकडून उत्साहात व भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. सकाळच्या प्रहरी येथील शाही सुन्नी मस्जिद मध्ये मुस्लीम बांधवांकडून ईदनिमित्त सामुहिक नमाज पठण करण्यात आले.या दरम्यान मौलाना मोहंमद सोहेल अख्तर शेख यांनी देशात शांतता बंधुभाव आणि समृद्धी नांदावी यासाठी अल्लाहकडे प्रार्थना देखील केली.त्यानंतर मुस्लीम बांधवांनी एकमेकांची गळा भेट घेत शुभेच्छांची देवाण घेवाण केली. याप्रसंगी शाही सुन्नी मस्जिद ट्रस्टचे असलम पठाण चांदभाई शेख सरवरखान पठाण सिकंदर इनामदार अमर तांबोळी तहसीलदार समशेर पठाण अमर आतार असलम नदाफ अल्तमश तांबोळी आयुब इनामदार रमजान शेख आदी मान्यवर उपस्थित होते. या दरम्यान वाल्हे पोलीस चौकीचे हवालदार भाऊसाहेब भोंगळे तसेच संतोष वाल्हेकर यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

## खा. स्व. निवृत्तीशेठ शेरकर यांचा स्मृतिदिन विविध कार्यक्रमांनी संपन्न



**नारायणगाव (दै. संध्या) :** श्री विघ्नहर साखर कारखान्याचे संस्थापक चेअरमन माजी खासदार स्व.निवृत्तीशेठ नामदेव शेरकर व स्व.हिराबाई निवृत्तीशेठ शेरकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आदर्शगाव पाटोदा येथील मा. सरपंच मा.श्री.भास्करराव पेरे पाटील हे या कार्यक्रमास उपस्थित होते.समाजाची सेवा करत असताना स्व. निवृत्तीशेठ शेरकर यांनी जुन्नर व आंबेगाव तालुक्यातील लोकांसाठी श्री विघ्नहर साखर कारखान्याची उभारणी करुन दोन्ही तालुक्यातील शेतकरी वर्गाचे आर्थिक जिवनमान उंचावण्याचे मोठे कार्य केले आहे. स्व. निवृत्तीशेठ शेरकर (शेठबाबा) यांच्यासारखे पारदर्शक, शेतकरी हिताचे निर्णय घेणारे आणि दूरदृष्टी असलेले आदर्श सरपंच आजच्या काळात होणे ही काळाची गरज आहे. त्यांच्यासारख्या नेतृत्वामुळेच ग्रामीण भागाचा शाश्वत विकास, सहकार्याची भावना आणि गावाचा सर्वांगीण विकास शक्य झाला. तसेच स्व.निवृत्तीशेठ शेरकर यांना त्यांच्या पत्नी हिराबाई शेरकर यांनी खंबीरसाथ दिली. स्व.निवृत्तीशेठ शेरकर यांनी स्थापन केलेल्या विघ्नहर सहकारी कारखान्याचा कारभार विद्यमान चेअरमन सत्यशिल शेरकर हे अगदी पारदर्शकपणे सांभाळत आहे. शेठबाबा यांनी दिलेल्या दिशेने तुम्ही चालला आहात.त्याच प्रमाणे त्यांचे नावच निवृत्ती असल्याने ते नावाप्रमाणे निस्वार्थी होते .स्व. निवृत्तीशेठ यांच्यासारखी निस्वार्थी व ध्येयवेडी माणसे यापुढील काळात होणार नाहीत. असे गौरोद्गार भास्करराव पेरे पाटील यांनी काढले.

जुन्नर तालुक्याचे भाग्यविधाते व श्री विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष माजी खासदार स्व. निवृत्तीशेठ शेरकर यांचे १९ वे व त्यांच्या पत्नी स्व. हिराबाई शेरकर यांच्या १७ वे पुण्यस्मरण दिनानिमित्त आयोजित अभिवादन सभेत प्रमुख पाहुणे म्हणून भास्करराव पेरे पाटील बोलत होते. पुढे त्यांनी गावच्या सरपंचांना किती अधिकार असतात आणि गावचा सरपंच कोणकोणती कामे करु शकतो याबाबत सविस्तर माहिती उपस्थितांना दिली. तसेच पर्यावरण संतुलनासाठी गावात मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड करावी, गाव स्वच्छ ठेवावे, गावातील वडीलधाऱ्या माणसांना सन्मानाने वागवावे, मुलांना चांगले शिक्षण आणि संस्कार द्यावेत.त्याच प्रमाणे त्यांनी स्वताच्या गावामध्ये त्यांच्या सरपंचपदाच्या काळात फिल्टर पाणी, मोफत दळण, मोफत गरम पाणी, गावात वायफाय इ. सुविधा मोफत व सवलतीच्या दरात ग्रामपंचायत मार्फत शेती मशागतीसाठी गावकऱ्यांना ट्रॅक्टर उपलब्ध करुन दिलेले आहेत. त्याप्रमाणे इतरही सरपंचांनी आपापल्या गावात अशा सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात. असे आवाहन याप्रसंगी त्यांनी केले.

## ज्येष्ठांसाठी ‘ग्रँडपॅरेंट केअर’ सामाजिक आरोग्य उपक्रम सुरू




**पुणे (दै. संध्या) :** भारत झपाट्याने वृद्धत्वाकडे जाणारा देश बनत आहे. सरकारी लोकसंख्या अंदाजानुसार, २०३६ पर्यंत भारतातील प्रत्येक सातपैकी एक व्यक्ती ६० वर्षांवरील असेल. महाराष्ट्रातही पुढील दशकात ज्येष्ठ नागरिकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता आहे.

पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात हा बदल आता रुग्णालये, घरे आणि कुटुंबांमध्ये स्पष्टपणे दिसू लागला आहे. गेल्या जवळपास १,००० दिवसांच्या सेवेनंतर व्हेन्सर हॉस्पिटलच्या डॉक्टरांनी एक महत्त्वाची बाब लक्षात आणून दिली की, रुग्णालयातील ४० टक्क्यांहून अधिक रुग्ण हे ज्येष्ठ नागरिक आहेत. व्हेन्सर हॉस्पिटल ही पाच डॉक्टरांनी स्थापन केलेली आणि चालवली जाणारी कौटुंबिक संस्था आहे. रुग्णालयाने सांगितले की, त्यांचा उद्देश केवळ रुग्णालय चालविणे नसून रुग्णांना प्राधान्य देणारे, परवडणारे आणि विश्वासार्ह मल्टिस्पेशालिटी कौटुंबिक रुग्णालय उभारणे हा आहे. रुग्णालयाच्या मते, ज्येष्ठ रुग्णांची वाढती संख्या ही केवळ आकडेवारी नसून समाजासाठी एक इशारा आहे. वृद्धत्व ही आता भविष्यातील समस्या नसून पुणे, महाराष्ट्र, भारत आणि जगासमोरील एक मोठे सामाजिक आणि आरोग्यविषयक आव्हान बनले आहे.

या पार्श्वभूमीवर व्हेन्सर हॉस्पिटलने “ग्रँडपॅरेंट केअर” हा ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष आरोग्य उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमांतर्गत प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा, दृष्टी काळजी, आपत्कालीन मदत, मानसिक आधार आणि सामाजिक संवाद या सर्व सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

व्हेन्सर हॉस्पिटलचे व्यवस्थापकीय संचालक आणि नेत्ररोग तज्ज्ञ डॉ. शरून शितोळे म्हणाले, “आम्ही व्हेन्सर हॉस्पिटलची सुरुवात प्रामाणिक, परवडणारी आणि रुग्णकेंद्री आरोग्यसेवा देण्याच्या उद्देशाने केली. पण जवळपास १,००० दिवसांच्या सेवेनंतर आम्हाला जाणवले की आमच्या रुग्णांपैकी ४० टक्क्यांहून अधिक रुग्ण ज्येष्ठ नागरिक आहेत. ही केवळ रुग्णालयाची जबाबदारी नाही, तर सामाजिक जबाबदारी आहे. भारत आणि महाराष्ट्र वृद्धत्वाकडे जात आहेत आणि पुण्यात त्याचे परिणाम दिसू लागले आहेत. ज्येष्ठांनी आपली काळजी घेतली, आता आरोग्य संस्थांनी त्यांची सन्मानाने आणि संवेदनशीलतेने काळजी घेणे आवश्यक आहे.”

व्हेन्सर हॉस्पिटलच्या डॉक्टरांनी सांगितले की, ज्येष्ठ नागरिकांची आरोग्यसेवा तुकड्या-तुकड्यांत विभागलेली राहू शकत नाही. अनेकदा वेगवेगळ्या गरजांसाठी वेगवेगळ्या डॉक्टरांकडे जावे लागते, चाचण्या कराव्या लागतात आणि मोठ्या प्रक्रियेतून जावे लागते. त्यामुळे गोंधळ, तणाव आणि उपचारांमध्ये विलंब होतो.

## आळंदी इंद्रायणी घाटावर सुरक्षा रक्षकास मारहाण

**आळंदी (दै. संध्या) :** इंद्रायणी नदी घाट परिसरात मद्यप्राशन करून गोंधळ घालणाऱ्या एका मद्यपी नागरिकाने नगरपरिषदेच्या सुरक्षा रक्षकास शिवीगाळ करत मारहाण केल्याची घटना मंगळवारी (दि.२६ मे) रात्री घडली. याप्रकरणी संबंधितावर तात्काळ गुन्हा दाखल करून कडक कारवाई करावी, अशी मागणी आळंदी नगरपरिषदेने दिघी पोलीस स्टेशनकडे केली आहे. नगरपरिषदेने दिलेल्या माहितीनुसार, इंद्रायणी नदी घाट परिसरात काही मद्यपी नागरिक रात्रीच्या वेळी मद्यप्राशन करून भाविकांना त्रास देत असल्याच्या तक्रारी सातत्याने प्राप्त होत होत्या. या पार्श्वभूमीवर भाविकांची सुरक्षा व घाट परिसरातील शांतता राखण्यासाठी नगरपरिषदेने रात्रीच्या वेळी सुरक्षा रक्षकांची नियुक्ती केली आहे. दरम्यान, राहूल रंगनाथ जगताप (रा. वाकडी, ता. लातूर, जि. लातूर) या व्यक्तीने घाट परिसरात मद्यप्राशन करून गोंधळ घातल्याचा आरोप आहे. कर्तव्यावर असलेल्या सुरक्षा रक्षकाने त्यास हटकले असता संबंधिताने अश्लील शिवीगाळ करत सुरक्षा रक्षकाच्या अंगावर धावून जात मारहाण केली. तसेच शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याचे नगरपरिषदेच्या तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. सार्वजनिक ठिकाणी मद्यप्राशन करून गोंधळ घालणे तसेच कर्तव्य बजावणाऱ्या कर्मचाऱ्यावर हल्ला करणे हा गंभीर गुन्हा असल्याचे नगरपरिषदेने म्हटले आहे. याप्रकरणी भारतीय न्याय संहिता (BNS) तसेच महाराष्ट्र पोलीस कायद्यानुसार संबंधितावर गुन्हा दाखल करून कडक कारवाई करावी, तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी इंद्रायणी घाट परिसरात रात्रीच्या वेळी पोलीस गस्त वाढवावी, अशी मागणी आळंदी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी माधव खांडेकर यांनी केली आहे.

# CDMO कार्यक्रमाचे कमर्शियल एक्सीक्यूशन सुरू

### संचालक मंडळाकडून आर्थिक वर्ष २०२६ साठी १० टक्के लाभांशाची शिफारस

**गुरुग्राम (दै. संध्या) :** मोरेपेन लॅबोरेटरीज लिमिटेडने आर्थिक वर्ष 2025-26 च्या चौथ्या तिमाहीत (Q4 FY26) दमदार आर्थिक कामगिरी नोंदवली आहे. मागील आर्थिक वर्षाच्या तुलनेत कंपनीचा निव्वळ नफा 69 टक्क्यांनी वाढून 20 कोटी रुपयांवर पोहोचला असून एकूण महसूल 22 टक्क्यांनी वाढून 472 कोटी रुपये झाला आहे. निर्यात व्यवसायातील वाढ आणि मेडिकल डिव्हाइसेस व्यवसायातील विस्तारामुळे ही वाढ साध्य झाल्याचे कंपनीने स्पष्ट केले आहे. कंपनीच्या API (ॲक्टिव्ह फार्मास्युटिकल इंग्रेडिएंट) व्यवसायात चौथ्या तिमाहीत 17 टक्के वाढ झाली, तर मेडिकल डिव्हाइसेस व्यवसायात 31 टक्क्यांची वाढ झाली. संपूर्ण आर्थिक वर्ष FY2025-26 मध्ये कंपनीचा स्टँडअलोन एकूण महसूल 1,700 कोटी रुपयांपेक्षा अधिक झाला असून तो मागील वर्षाच्या तुलनेत 8 टक्क्यांनी अधिक आहे. संचालक मंडळाने आर्थिक वर्ष 2026 साठी भागधारकांना 10 टक्के लाभांश देण्याची शिफारस केली आहे.

कंपनीने सलग चौथ्यांदा यूएसएफडीए तपासणी कोणत्याही प्रतिकूल निरीक्षणाशिवाय (Nil 483 Observation) यशस्वीरित्या पूर्ण केल्याची माहिती दिली. याशिवाय दीर्घकालीन उत्पादन कार्यक्रमांतर्गत व्यावसायिक उत्पादनालाही सुरुवात करण्यात आली आहे.

मोरेपेन लॅब्सला फेब्रुवारी 2026 मध्ये एका जागतिक बहुराष्ट्रीय औषध कंपनीकडून 825 कोटी रुपयांचा (91 दशलक्ष अमेरिकन डॉलर) बहुवर्षीय CDMO करार प्राप्त झाला होता. Q4 FY26 दरम्यान या प्रकल्पांतर्गत व्यावसायिक उत्पादन सुरू करण्यात आले असून व्हॅलिडेशन बॅचेस पूर्ण झाल्या आहेत. प्राथमिक पुरवठा वेळापत्रकही निश्चित करण्यात आले असून लवकरच पुरवठा सुरू होण्याची अपेक्षा कंपनीने व्यक्त केली आहे.

कंपनी सध्या उत्पादन क्षमता विस्तारावर भर देत आहे. विद्यमान सुमारे 500 KL क्षमता वाढवून 800 KL करण्याचे काम सुरू असून पुढील काळात ती 1,000 KL पर्यंत नेण्याची योजना आहे.

या तिमाहीत उत्पादन विस्तार, नियामित बाजारपेठ कार्यक्रम आणि मेडिकल डिव्हाइसेस व्यवसाय विस्तारासाठी सातत्याने गुंतवणूक करण्यात आली. FY2026 च्या चौथ्या तिमाहीत EBITDA 32 कोटी रुपये राहिला, जो मागील वर्षीच्या तुलनेत किंचित कमी आहे. कंपनीच्या मते, या गुंतवणुकीमुळे भविष्यात ऑपरेशनल क्षमता, मार्जिन वाढ आणि दीर्घकालीन वाढीस चालना मिळेल.




मोरेपेन लॅबोरेटरीज लिमिटेडचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक श्री. सुशील सूरी म्हणाले, “गेल्या काही वर्षांत मोरेपेनने मजबूत उत्पादन क्षमता, नियामक विश्वासार्हता आणि जागतिक ग्राहक संबंध निर्माण केले आहेत. आता आम्ही दीर्घकालीन उत्पादन भागीदारी, विस्तार आणि अधिक कार्यक्षमतेवर आधारित वाढीच्या पुढील टप्प्यात प्रवेश करत आहोत.”

API व्यवसायाचे कार्यकारी संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजय सूरी यांनी सांगितले की, “उत्पादन क्षमता 500 KL वरून 800 KL पर्यंत वाढवली जात असून पुढे ती 1,000 KL पर्यंत नेण्याचे लक्ष्य आहे. वाढती उत्पादन क्षमता आणि दीर्घकालीन पुरवठा कार्यक्रमांमुळे मध्यम कालावधीत नफाक्षमता सुधारण्यास मदत होईल.”

त्यांनी पुढे सांगितले की कंपनीने Resmetirom 100 mg या औषधासाठी जैव-समतुल्यता अभ्यास पूर्ण केला आहे. हे औषध MASH शी संबंधित मध्यम ते प्रगत यकृत फायब्रोसिस उपचारासाठी वापरले जाते. अमेरिका वगळता अनेक महत्त्वाच्या नियामित बाजारपेठांसाठी हा अभ्यास महत्त्वाचा मानला जात आहे.

मेडिकल डिव्हाइसेस व्यवसाय कंपनीसाठी वेगाने वाढणारे क्षेत्र ठरत आहे. FY2026 मध्ये या व्यवसायाचा महसूल 21 टक्क्यांनी वाढून 598 कोटी रुपयांवर पोहोचला. कंपनीकडे आता सुमारे 1.7 कोटी नियमित ग्राहकांचा आधार आहे. कंपनी हा व्यवसाय स्वतंत्र आणि उच्च-वाढीचा हेल्थकेअर प्लॅटफॉर्म म्हणून विकसित करत आहे.

उत्पादन विस्तार, उपकरण व्यवसाय, ग्राहक संपादन आणि हेल्थकेअर प्लॅटफॉर्ममध्ये करण्यात आलेल्या धोरणात्मक गुंतवणुकीचा अल्पकालीन नफ्यावर परिणाम झाला असला तरी भविष्यात मजबूत वाढ आणि स्थिर उत्पन्नासाठी हे महत्त्वाचे पाऊल असल्याचे कंपनीने म्हटले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंती निमित्त महापालिकेच्या वतीने अभिवादन

पिंपरी (दैनिक संध्या) : स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंती महानगरपालिकेच्या वतीने साजरी करण्यात आली. महानगरपालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीत झालेल्या या कार्यक्रमात उपमहापौर शर्मिला बाबर यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी उप आयुक्त अण्णा बोदडे,जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच सामाजिक कार्यकर्ते यशवंत कण्हेरे,विविध विभागातील कर्मचारी व नागरिक उपस्थित होते.



### पंडीत जवाहरलाल नेहरु यांच्या पुण्यतिथी निमित्त महापालिकेच्या वतीने अभिवादन

पिंपरी (दैनिक संध्या) : भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस महानगरपालिकेच्या वतीने महापौर रवि लांडगे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. महानगरपालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीत झालेल्या या कार्यक्रमास उपमहापौर शर्मिला बाबर, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच विविध विभागातील कर्मचारी व नागरिक उपस्थित होते. तसेच नेहरूनगर येथील भारतरत्न पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्या पुतळ्यास उपमहापौर शर्मिला बाबर यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर,नगरसदस्य राहूल भोसले, नगरसदस्या सारिका मासुळकर,जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.



### मोशीमध्ये इंधन दरवाढी विरोधात युवक काँग्रेसचे आंदोलन

पिंपरी (दैनिक संध्या) : केंद्र सरकारने मागील अकरा दिवसात चार वेळा पेट्रोल डिझेल च्या किमतीमध्ये दरवाढ केली. यामुळे औद्योगिक नगरीतील कष्टकरी जनतेचे आर्थिक गणित कोलमडले आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान मोदी यांना "महागाई मॅन मोदी" असे संबोधून टीका केली आहे, ती रास्त असल्याची भावना मोशी येथील पेट्रोल पंपावर इंधन भरण्यास आलेल्या नागरिकांमध्ये असल्याचे दिसून आले. सोमवारी, मोशी येथे भोसरी – मोशी रस्त्यावरील पेट्रोल पंपावर युवक काँग्रेसच्या वतीने इंधन दरवाढी विरोधात केंद्र सरकारचा निषेध करण्यात आला. यावेळी नागरिकांना मेलडी चॉकलेट देऊन त्यांच्या इंधन दरवाढी विरोधात प्रतिक्रिया जाणून घेण्याचा प्रयत्न युवा काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी केला. यावेळी केंद्र सरकारच्या विरोधात फलक हातात धरून घोषणा देण्यात आल्या. पिंपरी चिंचवड शहर काँग्रेसचे अध्यक्ष नरेंद्र बनसोडे, युवक काँग्रेसचे राष्ट्रीय प्रवक्ते गौरव चौधरी, प्रदेश युवक काँग्रेसचे सचिव व प्रभारी सत्यजीत बिरादार यांच्या उपस्थितीत आणि मार्गदर्शनाखाली भोसरी विधानसभा युवक काँग्रेसचे समन्वयक मयुर रोकडे व स्वप्नील रोकडे यांनी आंदोलनाचे आयोजन केले होते. यावेळी प्रदेश युवक काँग्रेसचे सचिव ॲड. उमेश खंदारे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस सामाजिक न्याय विभाग उपाध्यक्ष वहाब शेख, स्वप्नील रोकडे, मिनल रोकडे, साजिद खान, हिरा जाधव, हरीश डोळस, सुनील कांबळे, रुपेश जाधव, श्रीपाद लोंढे, इरफान खान आदी कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी पेट्रोल पंपावर येणाऱ्या नागरिकांना मेलडी चॉकलेट देऊन इंधन दरवाढ बाबत प्रतिक्रिया विचारण्यात आली. नागरिकांनी उस्फूर्तपणे प्रतिक्रिया दिल्या आणि इंधन दरवाढी व विरोधात तीव्र भावना व्यक्त केल्या. अच्छे दिन चे स्वप्न दाखवणाऱ्या मोदी सरकार बद्दल प्रचंड निराशा पदरी पडल्याचे एका ज्येष्ठ नागरिकांनी सांगितले.

### तळेगाव दाभाडे शाळांमध्ये शिक्षकांच्या खासगी शिकवणीवर कारवाईचे आदेश



तळेगाव दाभाडे (दैनिक संध्या) : शहरातील अनुदानित शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांमधील काही शिक्षकांकडून सुरू असलेल्या सशुल्क खासगी शिकवणी वर्गांविरोधात अखेर प्रशासनाने कठोर भूमिका घेतली आहे. तळेगाव शहर युवक काँग्रेसच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर नगर परिषद शिक्षण मंडळाने अशा शिकवणी वर्गांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष डॉ. विशाल वाळुंज व युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी या प्रकरणी शिक्षण मंडळाकडे अधिकृत तक्रार दाखल केली होती. शहरातील काही अनुदानित शाळांमधील शिक्षक शाळेतील अध्यापनाबरोबरच खासगी शिकवणी वर्ग चालवत असल्याने विद्यार्थ्यांवर आर्थिक भार पडत असल्याची बाब त्यांनी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिली होती. या तक्रारीची गंभीर दखल घेत प्रशासन अधिकारी अनिता वैद्य यांनी संबंधित शैक्षणिक संस्थांना स्पष्ट निर्देश दिले. शासन नियम व नगर परिषद सेवक आचारसंहितेनुसार शिक्षकांनी खासगी शिकवणी घेणे नियमबाह्य असल्याचे त्यांनी आदेशात नमूद केले आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम होऊ नये, तसेच शाळांमधील अध्यापन प्रक्रिया अधिक सक्षम व पारदर्शक राहावी, यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना काटेकोरपणे राबविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. यासोबतच संबंधित संस्थांनी शिक्षकांकडून मी कोणत्याही प्रकारची खासगी शिकवणी घेत नाही, अशा आशयाचे हमीपत्र घेण्याचेही आदेश प्रशासनाने दिले आहेत. या निर्णयामुळे पालकवर्गातून समाधान व्यक्त होत असून, शिक्षण व्यवस्थेत शिस्त व पारदर्शकता निर्माण होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# प्लंबर्सची मोठ्या प्रमाणात आवश्यकता



**पिंपरी (दै. संध्या)**

महाराष्ट्र नॅचरल गॅस लिमिटेड (एम एन जी एल) कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी यांच्या समवेत घरगुती पाईपलाईन जोडणी कामकाज संदर्भात नुकतीच बैठक घेण्यात झाली त्या बैठकीत कंपनीने कुशल मनुष्यबळ प्लंबर्सची मोठ्या प्रमाणात आवश्यकता असून याबाबत महापालिकेने सहकार्य करण्याबाबत विनंती केली होती.

त्यानुसार अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम यांच्या मार्गदर्शनाखाली, महापालिकेच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्था,मोरवाडी येथे उपरोक्त विषयांकित प्रकरणी एमएनजीएल यांच्या सहकार्यातून मार्गदर्शनपर कार्यक्रम व भरती मेळावा घेण्यात आला.यात संस्थेमधील प्लंबर या ट्रेडचे आजी व माजी विद्यार्थ्यांशी समक्ष संपर्क साधून त्यांना निमंत्रित करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्राचार्य तथा विभागप्रमुख शशिकांत पाटील यांनी विषयास अनुसरून माहिती दिली व भविष्यातील करिअरच्या दृष्टीने सदरचे कामकाज महत्त्वाचे असलेबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. एमएनजीएलचे वरिष्ठ व्यवस्थापक वासुदेव गुरसाळी यांनी विद्यार्थ्यांना कामकाजाबाबत सविस्तर माहिती दिली तसेच प्लंबर्स इच्छुक असतील तर एम. एन. जी. एल. कडून त्यांना २ दिवसांचे प्रशिक्षण दिले जाईल, प्रशिक्षणानंतर त्यांना अनुभवी प्लंबर्सच्या मार्गदर्शनाखाली साईटवर प्रत्यक्ष काम शिकवले जाईल तसेच भविष्यात सी जी डी कंपन्यांमध्ये कुशल प्लंबर्सची मागणी झपाट्याने वाढणार आहे, त्यामुळे या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

निवडलेले प्लंबर्स हे एम.एन.जी.एल.अधिकृत व्हेंडर्स अंतर्गत काम करतील. त्यांच्या कामाच्या कार्यक्षेत्रामध्ये एम.सी.व्ही. टू.इंस्टॉलेशन, मीटर इंस्टॉलेशन, कॉपर पाईपिंग आणि किचन कन्वर्जनचे काम समाविष्ट आहे.

मेहनत आणि प्रामाणिकपणाने काम केल्यास भविष्यात तुम्ही स्वतःचे उद्योजक (Entrepreneur) देखील बनू शकता असे नमूद केले तसेच जॉब वर्कनुसार महिन्याला साधारण ७० हजार पेक्षा जास्त कमाई देखील करू शकतात असेही कळविले. संस्थेतील साधारण ४० ते ५० प्लंबर विद्यार्थ्यांनी या क्षेत्रात करिअर करण्याची उत्सुकता दर्शविली असून संख्या अजून वाढणार आहे, त्यांनी सदर कार्यक्रम व भरती मेळावास निमंत्रित केल्याबद्दल संस्थेचे आभार मानले तसेच अजून प्लंबर्स इच्छुक असतील तर त्यांनी संस्थेस संपर्क साधावा असेही आवाहन औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे. एम.एन. जी.एल.यांच्यामार्फत उपप्रबंधक ओम उगले व उपप्रबंधक अमोल वैद्य यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.सदर कार्यक्रमाकरिता गटनिदेशक शर्मिला काराबळे, गटनिदेशक रवी ओव्हाळ, निदेशक किसन गावडे, निदेशक विक्रम काळोखे व निदेशक विशाल रेंगडे यांनी नियोजन केले होते.



### निगडीत मेट्रो कामादरम्यान पाण्याची पाईपलाईन फुटल्याने हजारो लिटर पाणी वाया

**पिंपरी (दै. संध्या)**

भक्ती शक्ती उड्डाणपूलाखाली श्रीकृष्ण मंदिर ते निगडी गावठाण मुंबई-पुणे महामार्ग परिसरात सुरू असलेल्या मेट्रो रेल्वेच्या कामादरम्यान जेसीबी मशीनने खोदकाम करताना (दि.२७) रोजी रात्री पाण्याची पाईपलाईन फुटल्याची घटना घडली. या घटनेमुळे हजारो लिटर पाणी वाया गेले असून परिसरातील पाणीपुरवठा काही काळासाठी बंद करण्यात आला होता. त्यामुळे नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागला. या घटनेचा फटका निगडी गावठाण, यमुनानगर, साईनाथनगर, लक्ष्मीनगर आदी भागातील नागरिकांना बसला. अचानक पाणीपुरवठा बंद झाल्याने नागरिकांची मोठी तारांबळ उडाली. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर पाण्याची समस्या निर्माण झाल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते सचिन काळभोर यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्तांकडे संबंधित मेट्रो रेल्वे ठेकेदारावर कडक कारवाई करण्याची मागणी केली आहे. "निगडी ते पिंपरी मेट्रो रेल्वेच्या कामादरम्यान अनेक वेळा पाणी पाईपलाईन फुटण्याच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे हजारो लिटर पाणी वाया जात असून नागरिकांना विनाकारण त्रास सहन करावा लागत आहे.

महानगरपालिका प्रशासनाने तातडीने दखल घेऊन संबंधित ठेकेदारांवर कठोर कारवाई करावी," अशी मागणी सचिन काळभोर यांनी केली आहे. नागरिकांनीही मेट्रो प्रकल्पाच्या कामांदरम्यान सुरक्षिततेच्या उपाययोजना काटेकोरपणे राबवण्याची मागणी प्रशासनाकडे केली आहे.

## रोहीदास कोंडे यांना पुरस्कार जाहीर

**पिंपरी (दै. संध्या)**



पिंपरी चिंचवड शहर क्रिकेट असोसिएशनच्यावतीने पिंपरी चिंचवड शहर क्रिकेट संघटनेचे संस्थापक कार्याध्यक्ष रोहीदास कोंडे यांना जीवन गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. तसेच राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर क्रिकेटमध्ये सर्वोत्कृष्ट कामगिरी केलेल्या मुले आणि मुलींचा सत्कार समारंभ तसेच दुसऱ्या "पिंपरी चिंचवड प्रिमीअर लीग' (पीसीपीएल) टी-२० क्रिकेट स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ ३१ मे रोजी रामकृष्ण हॉटेल, रावेत, बी आर टी रोड येथे आयोजित करण्यात आला आहे. याबाबत अधिक माहिती देताना संघटनेचे अध्यक्ष जगदीश शेट्टी आणि सचिव राजू कोतवाल यांनी सांगितले की, पिंपरी चिंचवड शहरामध्ये तसेच क्रिडा क्षेत्रामध्ये भरीव कामगिरी आणि विकासासाठी उल्लेखनीय योगदान दिल्याबद्दल आणि पिंपरी चिंचवड शहराचे माजी अतिरिक्त आयुक्त आणि संघटनेचे संस्थापक कार्याध्यक्ष रोहीदास कोंडे यांना 'जीवन गौरव पुरस्कार' देण्यात येणार आहे. मावळचे खासदार श्रीरंग अप्पा बारणे यांच्या हस्ते ३१ मे रोजी हा समारंभ होणार आहे. "पिंपरी चिंचवड प्रिमीअर लीग' (पीसीपीएल) टी-२० क्रिकेट स्पर्धेचे पारितोषिक वितरण समारंभही यावेळी होणार असून स्पर्धेतील १२ मुले आणि मुलींचा गौरवही यावेळी करण्यात येणार आहे.

# शिष्टमंडळाने मालमत्ता कर प्रणालीची घेतली माहिती

**पिंपरी (दै. संध्या)**

स्थानिक स्वराज्य संस्थांमधील मालमत्ता कर व्यवस्थापन अधिक प्रभावी, पारदर्शक आणि महसूलवृद्धीस चालना देण्याच्या उद्देशाने नवी मुंबई महापालिकेच्या शिष्टमंडळाने आज पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाला भेट दिली. यावेळी उपायुक्त सचिन पवार यांनी या शिष्टमंडळाला पिंपरी चिंचवड महापालिकेच्या मालमत्ता कर प्रणालीची सविस्तर माहिती दिली.



**उपायुक्त सचिन पवार यांनी केले मार्गदर्शन**

पिंपरी चिंचवड महापालिकेचे उपायुक्त सचिन पवार यांनी मालमत्ता कर व्यवस्थापनातील विविध प्रक्रिया, महसूलवाढीसाठी राबविण्यात येणाऱ्या उपाययोजना तसेच तंत्रज्ञानाधारित प्रणालींबाबत सविस्तर माहिती देताना सांगितले की, मालमत्ता कर व्यवस्थापन अधिक पारदर्शक, तंत्रज्ञानाधारित आणि नागरिककेंद्रित करण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिका सातत्याने प्रयत्नशील आहे. डिजिटल प्रणाली, जीआयएस सर्वेक्षण आणि कार्यक्षम महसूल व्यवस्थापनाच्या माध्यमातून सेवा अधिक परिणामकारक करण्यावर आमचा भर आहे. विविध महापालिकांमध्ये अशा अभ्यासभेटी आणि अनुभवांची देवाणघेवाण झाल्यास प्रशासनातील उत्तम पद्धती एकमेकांपर्यंत पोहोचतात. त्यामुळे महसूल व्यवस्थापन अधिक सक्षम होण्याबरोबरच नागरिकांना अधिक सुलभ, विश्वासार्हता आणि दर्जेदार सेवा उपलब्ध करून देणे शक्य होते. स्थानिक स्वराज्य संस्थांनी एकमेकांच्या यशस्वी उपक्रमांचा अभ्यास करून त्यांचा अवलंब करणे ही सकारात्मक आणि विकासाभिमुख प्रक्रिया आहे, असेदेखील त्यांनी सांगितले.

यावेळी नवी मुंबई महापालिकेच्या शिष्टमंडळाने मालमत्ता कर आकारणीची कार्यपद्धती, सर्वेक्षण व पुनर्मूल्यांकन प्रक्रिया, लेटिंग रेट निर्धारण, महसूलवाढीसाठी राबविण्यात येणारे उपक्रम, जनजागृती मोहिमा तसेच डिजिटल प्रणालींच्या वापराबाबत विशेष माहिती जाणून घेतली. तसेच जीआयएस आधारित सर्वेक्षण, थकबाकी वसुलीसाठी राबविण्यात येणाऱ्या उपाययोजना आणि नागरिकाभिमुख सेवा अधिक सक्षम करण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेकडून राबविण्यात येणाऱ्या नाविन्यपूर्ण उपक्रमांची माहिती देण्यात आली.

या अभ्यासभेटीमुळे दोन्ही महापालिकांमध्ये प्रशासनातील सर्वोत्तम पद्धतींची देवाणघेवाण होऊन अधिक कार्यक्षम, तंत्रज्ञानाधारित आणि नागरिकाभिमुख कर व्यवस्थापनाला चालना मिळणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

## मोरवाडी आयटीआयचा बारावी समकक्ष परीक्षा निकाल ८४ टक्के

**पिंपरी (दै. संध्या)**



पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आयटीआय मोरवाडी येथील विद्यार्थ्यांनी बारावी समकक्षता परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने नुकताच जाहीर केलेल्या इयत्ता १२ वी परीक्षेच्या निकालात संस्थेचा एकूण निकाल ८४.५१ टक्के लागला आहे. परीक्षेला बसलेल्या ७१ विद्यार्थ्यांपैकी ६० विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

शासनाने आयटीआयमधील व्यवसाय अभ्यासक्रमांना इयत्ता बारावीची समकक्षता दिली असून त्यासाठी मराठी व इंग्रजी हे विषय उत्तीर्ण होणे अनिवार्य करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांनी मिळवलेले यश उल्लेखनीय मानले जात आहे. संस्थेतील ऋषिकेश आंबावले (मोटार मेकॅनिकल ट्रेड) याने ८१.६७ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. सार्थक कुमकर (मोटार मेकॅनिकल ट्रेड) याने ७८.५० टक्के गुणांसह द्वितीय, तर निशित सुरवसे (मोटार मेकॅनिकल ट्रेड) याने ७४.५० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक प्राप्त केला.

विद्यार्थ्यांच्या यशामागे निदेशक अमोल शिंदे तसेच गटनिदेशक (सेवानिवृत्त) राजकुमार तिकोणे यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेमार्फत निदेशक विक्रम काळोखे, मुख्य लिपिक विजय भैलुमे आणि लिपिक विजय चावरिया यांनी संपूर्ण कामकाजाची जबाबदारी सांभाळली.

प्राचार्य शशिकांत पाटील यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करून प्रोत्साहनपर बक्षिसे दिली. तसेच विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक आणि व्यावसायिक वाटचालीसाठी शुभेच्छा देत अधिक मेहनतीने

## रिक्षाचालकांच्या तासन्तास रांगा

**दापोडी (दै. संध्या)**

सध्या इंधनाचा तुटवडा निर्माण झालेला आहे. पेट्रोल आणि डिझेलचा भाव वाढलेला असतानाही ते वेळेवर मिळत नसल्याची स्थिती आहे. पिंपरी-चिंचवड शहरासह राज्याच्या विविध जिल्ह्यांमध्ये सीएनजीचा मोठा तुटवडा निर्माण झाला आहे. तांत्रिक बिघाड, पुरवठ्यातील अडथळे आणि इंधन केंद्रांच्या दुरुस्तीच्या कामांमुळे ही परिस्थिती उद्भवली असून, वाहनचालकांना सीएनजी भरण्यासाठी तासन्तास रांगेमध्ये थांबावे लागत आहे. सध्या गॅसचा पुरवठा मागणीच्या तुलनेत कमी होत असल्याने वाहनचालकांना त्रास सहन करावा लागत आहे. शहराला सीएनजी (कॉम्प्रेस्ड नॅचरल गॅस) व एमएनजीएल (महाराष्ट्र नॅचरल गॅस) दिवसाला दोन लाख किलो ही दहा वर्षांसाठी मर्यादा होती. मात्र, ही मर्यादा तीन वर्षांमध्येच पूर्ण झाल्याने आज संपूर्ण शहरामध्ये गॅस तुटवडा जाणवत आहे.

आज शहरातील सीएनजी वाहनांची संख्या मर्यादेपेक्षा वाढलेली आहे. तसेच घरगुती गॅसची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे संपूर्ण शहरामध्ये गॅसचा तुटवडा जाणवत आहे. पंपावर कामगारांकडून गॅसची गाडी आलेली नाही, लाईट गेलेली आहे, आत्ताच गाडी संपली या ना त्या कारणांमुळे सीएनजी वाहनधारकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

# कुंडमळा पूल दुर्घटनेला एक वर्ष; अद्याप पुनर्बांधणी नाही, पर्यटक त्रस्त



कुंडमळा येथील पूल कोसळून एक वर्ष होत आहे; परंतु अद्याप शासनाने येथील पूल उभारला नाही. यामुळे स्थानिक नागरिकांना काही किलोमीटरचा प्रवास सध्या 12 ते 15 किलोमीटरचा वळसा घालून करावा लागत आहे. परंतु, काही तरुण व नागरिक तसेच पर्यटक या बंधाऱ्यावरून धोकादायक पद्धतीने प्रवास करत आहेत. यामुळे एखादी दुर्घटना घडण्याची शक्यता आहे.

**- सागर भेगडे, स्थानिक रहिवासी**

डीआरडीओ (संरक्षण संशोधन आणि विकास संस्था) यांनी त्यांचे नियमानुसार काम थांबविले आहे. पुलासाठी पर्यायी जागा शोधण्याचे काम सुरू आहे. जागा उपलब्ध झाली की काम सुरू करण्यात येईल.

**- धनराज दराडे, उपअभियंता, पीडब्ल्यूडी, वडगाव मावळ**

**तळेगाव स्टेशन (दै. संध्या)**

इंदोरीजवळील कुंडमळा येथील पूल 15 जून 2025 रोजी कोसळला होता. या वेळी पर्यटनासाठी आलेल्या काही पर्यटकांना जीव गमवावा लागला होता. या घटनेला आता एक वर्ष होत आले; परंतु अद्याप संबंधित प्रशासनाने येथील पूल उभारला नाही. यामुळे पावसाळ्यात कुंडमळा येथे पर्यटनास येणाऱ्या पर्यटकांची मोठी गैरसोय होणार आहे. हा पूल कधी होणार, असा प्रश्न पर्यटक व स्थानिक नागरिक करत आहेत. सदर पुलाचे काम नोव्हेंबर 2025 च्या दरम्यान सुरू करण्यात आले होते. परंतु, डीआरडीओ (संरक्षण संशोधन आणि विकास संस्था) यांनी त्यांच्या जागेवर 100 मीटरचे आत काम करता येणार नाही, असे लेखी सांगितल्याने ते काम थांबविण्यात आले आहे. पुलासाठी पर्यायी जागा शोधण्याचे काम सुरू आहे, असे प्रशासनाकडून सांगितले जात आहे. यामुळे पुलाच्या कामासाठी खणलेले खड्डे बुजविण्यास सुरवात झालेली आहे. यामुळे सध्या नागरिकांना, वाहनचालकांना इंदोरी, माळवाडी, भेगडेवाडी देहू येथून प्रवास करावा लागत आहे. यामुळे स्थानिक नागरिकांसह पर्यटकांचा वेळ आणि अंतर वाढल्याने खर्चदेखील वाढला आहे.

अनेक चारचाकी, दुचाकी चालक वाहत्या पाण्याच्या प्रवाहाच्या बंधाऱ्यावरुन धोकादायक पद्धतीने प्रवास करतात. पावसाळ्यात अथवा दररोज अशा पद्धतीने प्रवास करणे जीवावर बेतू शकते. पावसाळ्यात या भागात सतत पाऊस सुरू असतो. यामुळे पाण्याची पातळी सातत्याने कमी जास्त होते. अशा वेळी या बंधाऱ्यावरून प्रवास करणे धोक्याचे होऊ शकते. यामुळे येथील धोकादायक प्रवास थांबविणे गरजेचे आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### ज्ञानसागर गुरुकुलमध्ये कॅम्प दरम्यान अग्निशमन प्रशिक्षण

सावळ (बारामती) (दैनिक संध्या) : बारामती तालुक्यातील ज्ञानसागर गुरुकुल, सावळ येथे NCC Directorate, Delhi आणि 3 MAH ARMD SQN NCC, Pune यांच्या संयुक्त विद्यमाने NCC CATC-207 निवासी कॅम्प दिनांक 25 मे 2026 ते 3 जून 2026 या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे. या कॅम्पदरम्यान NCC कॅडेट्सना विविध विषयांवर मार्गदर्शन व प्रात्यक्षिक प्रशिक्षण देण्यात येत आहे.त्याचाच एक भाग म्हणून ज्ञानसागर गुरुकुल येथे कॅडेट्ससाठी अग्निशमन प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. या प्रशिक्षणामध्ये आग लागल्यास घ्यावयाची प्राथमिक काळजी,आगीचे प्रकार,अग्निशामक यंत्राचा योग्य वापर,आपत्कालीन परिस्थितीत सुरक्षित बाहेर पडण्याचे मार्ग,तसेच आपत्ती व्यवस्थापनाची मूलभूत माहिती कॅडेट्सना देण्यात आली.प्रशिक्षणादरम्यान विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून आग विझविण्याचे तंत्र समजावून सांगण्यात आले.अशा प्रकारच्या प्रशिक्षणामुळे कॅडेट्समध्ये धैर्य,तत्परता,जबाबदारीची जाणीव आणि आपत्कालीन परिस्थितीत योग्य निर्णय घेण्याची क्षमता विकसित होते.या कॅम्प चे प्रमुख कर्नल व्हीएनएस जोहर ( सेना मेडल ) तसेच अंकुश मांढरे व बाबुराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली या कॅम्पसाठी निवास,भोजन,प्रशिक्षण व इतर सर्व आवश्यक सुविधा उत्तम प्रकारे उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.शिस्त,संस्कार आणि राष्ट्रसेवेची भावना जोपासणाऱ्या या कॅम्पमुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला मोठी चालना मिळत आहे.




### बारामती तालुक्यातील लाईटच्या लोडशेडींगवर युगेंद्र पवार आक्रमक

■ युगेंद्र पवारांनी महावितरण अधिकाऱ्यांना धरले धारेवर

बारामती (दैनिक संध्या) : ऊर्जा भवन,बारामती येथे आदरणीय युगेंद्रदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली महावितरण अधिकाऱ्यांची भेट घेऊन बारामती तालुक्यातील नागरिकांच्या वीज समस्यांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.वाढते लोडशेडिंग, वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा तसेच नागरिकांना भेडसावणाऱ्या विविध अडचणींबाबत अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.यावेळी महावितरण अधिकाऱ्यांकडून लोडशेडिंगसारख्या महत्त्वाच्या प्रश्नांवर लवकरात लवकर सकारात्मक तोडगा काढण्याचे आश्वासन देण्यात आले.यावेळी ग्रामीण भागातील नागरिक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.



### जलतारा अभियानाचा आघार खुर्द येथे शुभारंभ

मालेगाव (दैनिक संध्या) : मालेगाव तालुक्यात राबविण्यात येत असलेल्या ‘जलतारा’ अभियानांतर्गत आज आघार खुर्द येथे जलतारा (शोषखड्डा) प्रकल्पाचा युवानेते श्री.अविष्कारजी भुसे यांच्या उपस्थितीत शुभारंभ करण्यात आला.भूजल पुनर्भरण आणि भविष्यातील पाणीटंचाईवर मात करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. यावेळी उपस्थित मान्यवरांनी प्रत्यक्ष शोषखड्ड्याची पाहणी करत प्रकल्पाच्या कार्यपद्धतीची माहिती घेतली.पावसाचे पाणी थेट जमिनीत मुरवून भूजल पातळी वाढविण्यास मदत करणारा हा अभिनव प्रयोग शेतकऱ्यांसाठी अत्यंत लाभदायी ठरणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. ‘हर खेत को पानी’ संकल्पनेअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या या प्रकल्पामुळे जलसंधारणास चालना मिळणार असून कमी पावसाच्या परिस्थितीतही शेतीसाठी पाण्याची उपलब्धता वाढण्यास मदत होणार आहे. मनरेगा अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमास ग्रामस्थ आणि शेतकऱ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून मालेगाव तालुक्यातील विविध गावांमध्ये या अभियानाचा विस्तार करण्यात येत आहे. यावेळी ग्रामपंचायत पदाधिकारी, सदस्य,शेतकरी,कृषी विभागाचे अधिकारी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धूळ खात पडलेल्या वाहनांना अखेर ‘घरचा रस्ता’

**बारामती ग्रामीण पोलिस ठाण्याचा स्तुत्य उपक्रम; ५ लाखांची १३ बेवारस वाहने मूळ मालकांच्या ताब्यात, आणखी ५० वाहनांसाठी शोधमोहीम वेगात**

बारामती (दै. संध्या)



पोलीस ठाण्याच्या आवारात वर्षानुवर्षे धूळ खात पडून असलेल्या मुद्देमालातील तसेच बेवारस वाहनांना अखेर न्याय मिळाला आहे. बारामती ग्रामीण पोलीस स्टेशनने राबविलेल्या विशेष मोहिमेत तब्बल १३ वाहनांचा शोध घेऊन ती मूळ मालकांच्या ताब्यात देण्यात आली. पोलिसांच्या या पुढाकारामुळे अनेक वाहनमालकांच्या चेहऱ्यावर समाधान दिसून आले असून पोलिसांप्रती विश्वासही निर्माण झाला आहे.

पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात आली. अनेक वर्षांपासून पोलीस ठाण्याच्या परिसरात पडून असलेल्या वाहनांची इंजिन व चेसिस क्रमांकाच्या आधारे पडताळणी करण्यात आली. काही वाहनांचे नंबर अस्पष्ट झाले होते, तर काही वाहनांची अवस्था अतिशय खराब झाली होती. तरीही पोलिसांनी आरटीओ नोंदी, जुने गुन्हे रेकॉर्ड आणि कागदपत्रांचा आधार घेत संबंधित मालकांचा शोध घेतला.

वाहनांची ओळख पटविल्यानंतर संबंधित मालकांना संपर्क करून कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आणि त्यानंतर ही वाहने मालकांच्या स्वाधीन करण्यात आली. अनेक वाहनमालकांनी वर्षानुवर्षे आपली वाहने मिळण्याची आशाच सोडली होती. मात्र पोलिसांच्या या मोहिमेमुळे त्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. पोलीस ठाण्यांच्या आवारात मोठ्या प्रमाणावर बेवारस वाहने पडून राहत असल्याने जागेची कमतरता निर्माण होते. शिवाय अनेक वाहने पावसात-उन्हात खराब होत जातात. त्यामुळे अशा वाहनांची योग्य तपासणी करून ती मूळ मालकांना परत देण्याचा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.

या सर्व वाहनांची अंदाजे किंमत सुमारे ५ लाख २० हजार रुपये इतकी असून, येत्या काही दिवसांत आणखी ५० बेवारस वाहनांचा शोध घेऊन तीही मूळ मालकांच्या ताब्यात देण्यासाठी प्रक्रिया सुरू असल्याची माहिती पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांनी दिली.

ही आहेत वाहने आणि त्याचे मालक : बाळासाहेब आल्हाट, रा. माळेगाव बुद्रुक ता. बारामती MH-42 X-1912, किशोर दळवी, रा. दहिगाव ता. माळशिरस MH-45 Z-2285, विशाल निंबाळकर, रा. फरतडवाडी ता. फलटण MH-11 BF-8469, शरद भगवान गरुड, रा. वाल्हे ता. पुरंदर MH-12 GJ-2373, किरण सतीश जराड, रा. माळेगाव बुद्रुक शिवनगर ता. बारामती MH-42 AK-3270, रामदास धोंडीबा चव्हाण, रा. काळेवाडी ता. दौंड MH-42 R-2079, कुंडलिक जयसिंग घोरपडे, रा. कोळवीहरे ता. पुरंदर MH-12 GY-2034, अमर आजिनाथ भोसले, रा. झारगडवाडी ता. बारामती MH-42 AL-5526, सुनील दत्तात्रय कोकणे, रा. झारगडवाडी ता. बारामती MH-42 AL-4162, सदाशिव विश्वनाथ कोठाळे, रा. गोखळी ता. फलटण MH-11 CR-3374, अण्णा उत्तम चव्हाण, रा. कोपर्डी हवेली ता. कराड MH-50 E-7379, राजेंद्र वसंत आटोळे, रा. गोखळी ता. फलटण MH-42 AC-3771, नंदकुमार कोंडीबा लोंढे, रा. देऊळगाव रसाळ ता. बारामती MH-42 U-6205

पोलिसांच्या या कामकाजाबद्दल नागरिकांत समाधान व्यक्त होत असून, 'पोलीस केवळ गुन्हे उघड करत नाहीत, तर नागरिकांच्या मालमत्तेची जबाबदारीही जपतात,' अशी प्रतिक्रिया वाहन मालकांनी दिली.

ही कारवाई पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल,अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली बारामती तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव तसेच कल्याण शिंगाडे,भारती खंडागळे,नितीन ढवाण,निलेश वाकळे यांनी केली.

## बारावीच्या अल्पवयीन विद्यार्थिनीवर अल्पवयीन मुलाकडून वारंवार अत्याचार

लोणी काळभोर (दै. संध्या)

सोशल मीडियावर फोटो व्हायरल करून बदनामी करण्याची धमकी देऊन अल्पवयीन विद्यार्थिनीला लॉजवर नेऊन वारंवार अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली आहे. मुलगी फोनवर वारंवार बोलत असल्याने हा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी पोलीस ठाण्यात अल्पवयीन मुलाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी पिडीतेच्या ३९ वर्षीय आईने लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यावरून १७ वर्षाच्या अल्पवयीन मुलावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पिडीत मुलगी हि लोणी काळभोर परिसरातील एका शैक्षणिक संकुलात बारावीच्या वर्गात शिक्षण घेत आहे. शालेय शिक्षणादरम्यान दोघांची ओळख झाली असून इयत्ता सहावी ते आठवीदरम्यान दोघे एकाच शाळेत शिकत होते. त्यानंतर संपर्क तुटला होता.

मे २०२५ मध्ये बारावीच्या उन्हाळी क्लासदरम्यान मुलाने पिडीतेच्या मोबाईलवर संपर्क साधला. 'तुझे काही फोटो माझ्याकडे आहेत,' असे सांगून त्याने तिला भेटण्यासाठी बोलावले. सुरुवातीला मुलीने दुर्लक्ष केले, परंतु फोटो व्हायरल करण्याची धमकी दिल्याने ती घाबरली व त्याला भेटली. त्याने तिला शेवाळवाडी, हडपसर येथील एका लॉजवर नेले. तेथे लग्नाचे आमिष दाखवत तसेच फोटो व्हायरल करण्याची भीती घालून तिच्या इच्छेविरुद्ध शारीरिक संबंध ठेवले. त्यानंतर अनेक वेळा याची पुनरावृत्ती झाल्याचा आरोप आहे.

## कांद्याला कवडीमोल भाव मिळत असल्याने अनेक शेतकरी हवालदील

माळेगाव (दै. संध्या)

■ कांदा रस्त्यावर फेकून देण्याऐवजी मोफत वाटप

■ सांगवी गावातील प्रगतशील शेतकरी भानुदास भगवान जगताप यांचा दानशूरपणा



कांद्याला कवडीमोल भाव मिळत असल्याने अनेक शेतकरी हवालदिल झाले आहेत.मात्र अशाच कठीण परिस्थितीत एका शेतकऱ्याने माणुसकीचा आदर्श घालून दिला आहे.उत्पादन केलेला कांदा रस्त्यावर फेकून देण्याऐवजी त्यांनी गोरगरिबांना मोफत वाटून समाजासमोर दानशूरपणाचे उत्तम उदाहरण ठेवले आहे.सांगवी ता.बारामती येथे जिल्हा परिषदेचा आदर्श सरपंच पुरस्कार मिळालेले प्रगतशील शेतकरी भानुदास भगवान जगताप असे दानशूर शेतकऱ्याचे नाव आहे.भानुदास जगताप हे अल्पभूधारक शेतकरी असून त्यांनी आपल्या तीन एकर क्षेत्रात कांदा हे पिक घेतले होते. कांदा लागवडी पासुन उत्पादन घेईपर्यंत पत्नी विमल जगताप व दोन मुले सिध्दार्थ व अमर जगताप यांनी खुप मेहनत घेतली.कांद्याचे चांगले उत्पादन झाले.साधारणपणे ५५ ते ६० किलोच्या ३५० पिशव्यांचे उत्पादन झाले.कष्टाने पिकवलेल्या कांद्याला बाजारात योग्य भाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांच्या डोळ्यांत अश्रू आहेत.उत्पादन खर्चही निघत नसताना अनेक शेतकरी निराश झाले आहेत. अशा वेळी या शेतकऱ्याने निराश न होता सामाजिक बांधिलकी जपत सांगवी गावातील गरजू कुटुंबांना चक्क ५५ ते ६० किलो वजनाच्या तब्बल २७० कांद्याच्या गोणीचे मोफत वाटप केले.तसेच उन्हामुळे कांदा खराब झाल्याने इतर गोण्या शेतात खत म्हणून वापरण्यासाठी टाकला. त्यांच्या या कृतीमुळे समाजात माणुसकी अजून जिवंत असल्याचा संदेश मिळाला. शेतकरी हा केवळ अन्नदाता नसून समाजाचा आधारस्तंभ आहे,हे या घटनेतून पुन्हा अधोरेखित झाले आहे.स्वतः आर्थिक संकटात असतानाही दुसऱ्यांच्या मदतीसाठी पुढे येणे,ही मोठी दानशूर वृत्ती आहे. पैशापेक्षा माणुसकी मोठी असते,हे या शेतकऱ्याने आपल्या कृतीतून दाखवून दिले.

> शेतकऱ्यांचे मन फार मोठे आहे. शेती परवडत नसली तरी जगाचा पोशिंदा म्हणून काम करावे लागते. कांदा फेकून देण्याऐवजी त्याचे मोफत वाटप करणे पसंत केले. शासनाने शेतकऱ्यांच्या पिकांना हमी भाव द्यावा.हमी भाव मिळाला तरच शेती करता येईल.अन्यथा शेतकऱ्यांना जगणे मुश्किल होईल.
>
> **- भानुदास भगवान जगताप**
> **- शेतकरी सांगवी ता.बारामती**

## कल्याणच्या दुर्गाडी परिसरात तणाव; रस्त्यावर आरती, घोषणाबाजी!

### आंदोलक आक्रमक, बॅरिकेडसवर चढले, पोलिसांकडून धरपकड

भिवंडी (दै. संध्या)



कल्याणचा ऐतिहासिक दुर्गाडी किल्ला आणि गेल्या ४० हून अधिक वर्षांपासून धगधगत असलेला धार्मिक वाद यंदाच्या बकरी ईदच्या निमित्ताने पुन्हा एकदा पेटला आहे. कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी जिल्हा प्रशासनाने बकरी ईदच्या दिवशी हिंदू भाविकांना दुर्गाडीवरील मंदिरात प्रवेश बंदी घातली आहे. तर दुसरीकडे, वर्षातील इतर दिवशी किल्ला परिसरात कोणत्याही प्रकारच्या इस्लामी उपासनेला मनाई करण्यात आली आहे. प्रशासनाच्या निर्णयाविरोधात शिवसेना शिंदे गट, ठाकरे गट आणि भाजपच्या कार्यकर्त्यांनी आंदोलन केले. प्रशासनाने केलेल्या मनाई आदेशाविरोधात गुरुवारी सकाळीच शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी दुर्गाडी किल्ल्यावर आक्रमक होत जोरदार आंदोलन केले. यावेळी आंदोलकांनी दुर्गाडी किल्ल्यावर प्रवेश करण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांनी त्यांना अटकाव करत ताब्यात घेतले. पोलिसांनी कडेकोट बंदोबस्त ठेवला असून बॅरिकेट्सही उभे केले आहेत. या आंदोलनाच्या परिणामी परिसरात काहीशी तणावपूर्ण स्थिती आहे. यंदाच्या आंदोलनात दोन्ही शिवसेना गटांसोबत भाजपचे कार्यकर्तेही सहभागी झाल्याने राजकीय वातावरण अधिकच तापले आहे. दुर्गाडी किल्ल्याच्या माथ्यावर ऐतिहासिक दुर्गा देवीचे मंदिर आहे, तर किल्ल्याच्या पायथ्याशी ईदगाह आहे. हिंदू संघटनांचा दावा आहे की हे मूळचे दुर्गा देवीचे स्थान आहे, तर मुस्लीम समाजाकडून तिथे ईदगाह असल्याचा दावा केला जातो. गेल्या ५० वर्षांहून अधिक काळ हा वाद सुरू असून सध्या हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

१९८२ मध्ये शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी ईदच्या दिवशी हिंदू भाविकांना होणाऱ्या प्रवेश बंदीला विरोध केला होता. त्यांच्याच आदेशानुसार १९८६ मध्ये तत्कालीन शिवसेनेचे जिल्हाप्रमुख आनंद दिघे यांनी 'घंटानाद आंदोलन' सुरू केले होते. तेव्हापासून दरवर्षी बकरी ईदला येथे आंदोलनाची ठिणगी पडते. सध्या न्यायालयाचा अंतिम निकाल प्रलंबित असल्याने प्रशासनाकडून येथे तात्पुरती व्यवस्था केली जाते. सुरक्षेचा उपाय म्हणून राज्य राखीव पोलीस दलाची तुकडी आणि स्थानिक पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त या परिसरात तैनात करण्यात आला आहे.

## मला शरीरसुख दे, नाहीतर त्याला जेलमध्ये सडवतो

लोणी काळभोर (दै. संध्या)

अल्पवयीन मुलीचा हात पकडून तिची छेडछाड केल्याप्रकरणी येरवडा कारागृहात सजा भोगत असलेल्या दिराची सुटका करायची असेल तर मला शरीरसुख दे, नाहीतर त्याला जेलमध्ये सडवतो. अशी धमकी देवुन महिलेला शिवीगाळ करणाराविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी ३२ वर्षांच्या पिडीतेने दिलेल्या फिर्यादीवरून कैलास दौलत सावंत (रा. चव्हाण वस्ती, थेऊर ता. हवेली) यांचेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पिडीता १६ मे रोजी रात्री ९.३० वाजण्याच्या सुमारांस नेहमीप्रमाणे घराचे पाठीमागे येथे शौचास जात होती, त्यावेळी रस्त्यामध्ये तिच्या ओळखीचा कैलास सावंत हा तेथे आला. व 'तुझ्या दिराची सुटका करायची असेल तर माझ्या सोबत झोप' असे म्हणाला. त्यावेळी तिने त्यास शिव्या दिल्या व तेथून घरी निघुन आली. ती खुप घाबरली असल्याने व तिच्या घरी कोणी कर्ता पुरुष नसल्याने याबाबत तिने कोणास काही सांगितले नाही.

त्यानंतर २० मे रोजी याची पुनरावृत्ती झाली. त्यानंतर २२ मे रोजी रात्री ९.३० वाजण्याच्या सुमारास पुन्हा सावंत याने तिला माळरानामध्ये गाठुन तिचा हात पकडला व तिच्याकडे शरीर सुखाची मागणी केली. त्याने हात पकडल्याने तिला खुप राग आला त्यामुळे पिडीतेने त्याला शिव्या दिल्या.

# प्रादेशिक मानसिक आरोग्य रुग्णालयांचे अध्यापन संस्थांमध्ये रूपांतर करण्यात येणार

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

भिवंडी (दै. संध्या)



महाराष्ट्रातील येरवडा, ठाणे, रत्नागिरी आणि नागपूर येथील प्रादेशिक मानसिक आरोग्य रुग्णालयांचे अध्यापन संस्थांमध्ये रूपांतर करणे हा केवळ आरोग्य व्यवस्थेचा विस्तार नसून, गुणवत्तापूर्ण उपचार, संशोधन आणि प्रशिक्षित मनुष्यबळ निर्मितीच्या दिशेने टाकलेला दूरदर्शी आणि मानवकेंद्री पाऊल आहे. यामुळे समाजातील वंचित घटकांपर्यंत अधिक सक्षम, सुलभ आणि आधुनिक मानसिक आरोग्य सेवा पोहोचविण्याचा आमचा संकल्प अधिक बळकट होणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, महाराष्ट्र राज्यातील येरवडा (पुणे), ठाणे, रत्नागिरी आणि नागपूर येथील चार प्रादेशिक मानसिक आरोग्य रुग्णालये समाजातील विशेषतः वंचित घटकांना मोठ्या प्रमाणावर आरोग्य सेवा पुरवत आहेत. बाह्यरुग्ण व आंतररुग्ण सेवांद्वारे ही रुग्णालये हजारो रुग्णांना उपचार देत असून, सुमारे ५७०० खाटांची सुविधा उपलब्ध असल्यामुळे त्यांच्याकडे मोठ्या प्रमाणावर पायाभूत सुविधा व मनुष्यबळ आहे. या पार्श्वभूमीवर, राज्य शासनाने या रुग्णालयांचे अध्यापन संस्थांमध्ये रूपांतर करण्याचा महत्त्वपूर्ण प्रस्ताव पुढे आणला आहे. या उपक्रमामुळे मानसिक आरोग्य क्षेत्रात दर्जेदार उपचार सेवांसोबतच शिक्षण आणि संशोधनालाही चालना मिळणार आहे.

केंद्र शासनाच्या मॅनपॉवर डेव्हलपमेंट स्कीम अंतर्गत, स्ट्रेंथनिंग पीजी डिपार्टमेंट इन मेंटल हेल्थ स्पेशालिटिज (स्कीम बी) या योजनेनुसार मानसिक आरोग्य क्षेत्रात प्रशिक्षित मनुष्यबळाची कमतरता दूर करण्यासाठी उपाययोजना करण्यात येत आहेत. राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रमांतर्गत (एनएमएचपी) १२व्या पंचवार्षिक योजनेपासून या दिशेने विशेष भर देण्यात आला आहे. ज्या ठिकाणी आधीपासून पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत, अशा प्रादेशिक रुग्णालयांमध्ये मानसिक आरोग्याशी संबंधित पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्यास प्राधान्य देण्यात येत आहे.

राज्य शासनाने १६ सप्टेंबर २०१९ रोजी शासन निर्णय निर्गमित करून खालील अभ्यासक्रमांना मान्यता दिली आहे : एम.डी. सायकिअ‍ॅट्री एम.फिल क्लिनिकल सायकॉलॉजी एम.फिल सायकियाट्रिक सोशल वर्क डिप्लोमा इन सायकियाट्रिक नर्सिंग हे अभ्यासक्रम प्रादेशिक मनोरुग्णालय ठाणे, पुणे (येरवडा) आणि नागपूर येथे सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

प्रादेशिक मनोरुग्णालय नागपूर येथे वैद्यकीय शिक्षण विभाग व सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या संयुक्त प्रयत्नांतून एम.डी. सायकिअ‍ॅट्री अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे.

इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथील अध्यापकांच्या सहकार्याने हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून सुरू झाला असून, दरवर्षी ४ विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जात आहे. आजपर्यंत १२ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला असून, त्यापैकी २ विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रम पूर्ण केला आहे.

प्रादेशिक मनोरुग्णालय ठाणे व पुणे येथे डिप्लोमा इन सायकियाट्रिक नर्सिंग अभ्यासक्रम २०२२-२३ पासून सुरू करण्यात आला आहे.प्रत्येक ठिकाणी दरवर्षी २० विद्यार्थी प्रवेश घेत आहेत.आतापर्यंत ठाणे येथून ५९ आणि पुणे येथून ६० विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

या उपक्रमामुळे मानसिक आरोग्य क्षेत्रात प्रशिक्षित नर्सिंग कर्मचाऱ्यांची उपलब्धता वाढण्यास मदत होत आहे.

या चारही प्रादेशिक मानसिक आरोग्य रुग्णालयांचे पूर्णतः अध्यापन संस्थांमध्ये रूपांतर केल्यामुळे पुढील फायदे अपेक्षित आहेत. रुग्णांना अधिक दर्जेदार आणि विशेषज्ञ उपचार सेवा. मानसिक आरोग्य क्षेत्रात प्रशिक्षित डॉक्टर, मानसशास्त्रज्ञ व सामाजिक कार्यकर्त्यांची संख्या वाढ. संशोधन आणि नवोपक्रमाला चालना. ग्रामीण व वंचित भागांपर्यंत गुणवत्तापूर्ण मानसिक आरोग्य सेवा विस्तार होणार.

महाराष्ट्रातील प्रादेशिक मानसिक आरोग्य रुग्णालयांचे अध्यापन संस्थांमध्ये रूपांतर हा केवळ आरोग्य क्षेत्रातील नव्हे तर शिक्षण आणि सामाजिक विकासाच्या दृष्टीनेही एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. केंद्र व राज्य शासनाच्या समन्वयातून राबविण्यात येणारा हा उपक्रम राज्यातील मानसिक आरोग्य सेवांना नवे बळ देणारा ठरेल.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### मराठी ZEE5वर 'सुपर डुपर'चा डिजिटल प्रीमियर 29 मे रोजी

मुंबई (दैनिक संध्या) : दिग्दर्शक समीर आशा पाटील यांच्या खुसखुशीत विनोदी-नाट्यपट 'सुपर डुपर'चा डिजिटल प्रीमियर आता मराठी ZEE5वर होणार आहे. चित्रपटगृहांमध्ये प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळाल्यानंतर हा चित्रपट २९ मे २०२६ रोजी डिजिटल माध्यमातून प्रदर्शित केला जाणार आहे. ९९ प्रॉडक्शन्स आणि सिद्धिविनायक प्रॉडक्शन्स यांनी झी स्टुडिओजच्या सहकार्याने या चित्रपटाची निर्मिती केली आहे. चित्रपटात अभिनेता ललित प्रभाकर, विदुला चौगुले, निर्मिती सावंत, हृषीकेश जोशी, शशांक शेंडे, कुशल बद्रिके आणि नम्रता संभेराव यांच्या प्रमुख भूमिका आहेत. 'सुपर डुपर'ची कथा मुंबईत स्वतःची स्वप्ने पूर्ण करण्यासाठी संघर्ष करणाऱ्या रोहित आणि ईशा या तरुण जोडप्याभोवती फिरते. त्यांनी खरेदी केलेला फ्लॅट चुकून जाधव कुटुंबालाही विकला गेल्याचे समोर आल्यानंतर मोठा गोंधळ उडतो. न्यायालयाच्या आदेशानुसार दोन्ही कुटुंबांना एकाच घरात राहावे लागते आणि त्यातून विनोदी तसेच भावनिक प्रसंगांची मालिकाच सुरू होते. शहरी जीवनशैली आणि पारंपरिक मूल्यांतील संघर्ष, पिढ्यांमधील मतभेद, नात्यांमधील भावना आणि मुंबईतील घरांच्या समस्येवर हलक्याफुलक्या शैलीत भाष्य करणारी कथा हे या चित्रपटाचे वैशिष्ट्य आहे. अनुभवी कलाकारांचा सहजसुंदर अभिनय आणि वास्तववादी विनोदामुळे चित्रपटाला प्रेक्षकांची पसंती मिळाली आहे. झी मराठीच्या चीफ चॅनल ऑफिसर आणि मराठी ZEE5च्या बिझनेस हेड हेमा व्ही. आर. यांनी सांगितले की, 'सुपर डुपर' हा विनोद, भावना आणि कौटुंबिक नात्यांचा सुंदर मिलाफ असलेला चित्रपट असून डिजिटल प्रीमियरमुळे तो अधिक व्यापक प्रेक्षकांपर्यंत पोहोचेल. दिग्दर्शक समीर आशा पाटील यांनीही हा चित्रपट मतभेद असूनही एकत्र राहायला शिकणाऱ्या लोकांची कथा असल्याचे सांगितले. तसेच कलाकार निर्मिती सावंत, ललित प्रभाकर आणि नम्रता संभेराव यांनीही चित्रपटातील व्यक्तिरेखा आणि कथानक प्रेक्षकांना आपलेसे वाटेल, असा विश्वास व्यक्त केला.

### महाराष्ट्रात सार्वजनिक क्षेत्रातील तेल विपणन कंपन्याकडून अखंड इंधन पुरवठा

मुंबई (दैनिक संध्या) : इंडियनऑइल महाराष्ट्र राज्यभर अखंड संचालन आणि लॉजिस्टिक्स समन्वय सुनिश्चित करत असून प्रत्येक ग्राहकासाठी दररोज पेट्रोल (MS), डिझेल (HSD) आणि एलपीजीची अखंड उपलब्धता कायम ठेवत आहे. भारतामधील नागरिकांच्या प्रत्येक सामान्य दिवसामागे सार्वजनिक क्षेत्रातील तेल विपणन कंपन्यांची (PSU OMCs) 24X7 असामान्य तयारी कार्यरत असते आणि वाढीची आकडेवारी याचीच साक्ष देते. महाराष्ट्रात मे 2026 दरम्यान मागील वर्षाच्या याच कालावधीच्या तुलनेत पेट्रोल (MS) किरकोळ विक्रीत 22% वाढ नोंदविण्यात आली आहे, तर डिझेल (HSD) किरकोळ विक्रीत 33% ची मजबूत वाढ झाली आहे. इतर पुरवठादारांच्या तुलनेत असलेल्या किंमत फरकामुळे संस्थात्मक आणि व्यावसायिक ग्राहक इंडियनऑइल रिटेल आउटलेट्सकडे वळत असून तसेच हंगामी शेतीविषयक कामकाजामुळे मागणीत वाढ होत आहे. भारताच्या अखंड गतिमानतेमागे एक असे नेटवर्क कार्यरत आहे जे कधीही थांबत नाही —शेतांपासून महामार्गांपर्यंत,डोंगराळ भागांपासून किनारपट्टीपर्यंत,दुर्गम प्रदेशांपासून आव्हानात्मक सीमांपर्यंत, अनिश्चित जागतिक परिस्थितीतही इंडियनऑइल अखंड इंधन पुरवठा सुनिश्चित करत आहे. इंडियनऑइल पुन्हा एकदा स्पष्ट करते की देशभरात पेट्रोल, डिझेल आणि एलपीजीचा पुरेसा साठा उपलब्ध आहे.सुरळीत,अखंड आणि सातत्यपूर्ण इंधन पुरवठा कायम ठेवण्यासाठी सर्व आवश्यक उपाययोजना करण्यात येत असून, ही कार्यवाही सेवा सातत्य आणि सामूहिक जबाबदारीच्या भावनेतून प्रेरित आहे. नागरिकांना विनंती करण्यात येते की त्यांनी नेहमीप्रमाणेच खरेदीचे व्यवहार सुरू ठेवावेत आणि अनावश्यक घबराटीतून इंधनाची अतिरिक्त खरेदी टाळावी. देश विश्वासावर चालतो — आणि आम्ही बांधिलकीवर. इंधन उपलब्धतेसंदर्भातील अचूक माहितीसाठी ग्राहकांनी केवळ इंडियनऑइल आणि अधिकृत संस्थांकडून जारी करण्यात आलेल्या अधिकृत माहितींवरच विश्वास ठेवावा.




### 40 हून अधिक चित्रपटांच्या भव्य प्रीमियर मॅरेथॉनची झी सिनेमातर्फे सुरुवात

मुंबई (दैनिक संध्या) : अब नजर नहीं हटेगी झी सिनेमा से, क्यूंकि यहां प्रीमियर्स होंगे आऊट ऑफ कंट्रोल! या उन्हाळ्याला ब्लॉकबस्टर उत्सवात बदलत झी सिनेमा वाहिनी 40 हून अधिक चित्रपटांच्या प्रीमियरची भव्य शृंखला घेऊन येत आहे. यात प्रेक्षकांना ॲक्शनचा जबरदस्त धमाका, रोमहर्षक कथा आणि अखंड ब्लॉकबस्टर मनोरंजनाचा अनुभव मिळणार आहे. एकामागोमाग एक नव्या प्रीमियर्ससह प्रेक्षकांना नॉन-स्टॉप मनोरंजनाची सफर पहिल्यापेक्षाही अधिक जोमाने अनुभवता येणार आहे. प्रीमियर्सच्या या मालिकेची सुरुवात 'अखंडा 2' या चित्रपटाने होणार असून त्याचा प्रीमियर सोमवार, 1 जून रोजी रात्री 8 वाजता होईल. नंदामुरी बालकृष्ण यांची प्रमुख भूमिका आणि बोयापती श्रीनु यांच्या दिग्दर्शनाखाली तयार झालेला हा चित्रपट श्रद्धा आणि अध्यात्मावर आधारित असून, वाढत्या अंधाराविरुद्ध धर्माचे रक्षण करणाऱ्या दैवी शक्तीभोवती ही कथा फिरते. अभिनेता - दिग्दर्शक या ब्लॉकबस्टर जोडीला पुन्हा एकदा एकत्र आणत भक्ती, न्याय आणि भव्य ॲक्शन यांचा जबरदस्त संगम साधत हा चित्रपट कथेला अधिक प्रभावी बनवतो. यात पाहायला मिळतो. 'अखंडा 2' मध्ये लढाई केवळ भौतिक पातळीवर मर्यादित न राहता धर्माच्या संतुलनाला आव्हान देणाऱ्या अदृश्य शक्तींचाही सामना करते. सनातन धर्म आणि दैवी ऊर्जेचा प्रभाव असलेला हा चित्रपट प्रेक्षकांना एक वेगळ्याच आध्यात्मिक पातळीवरील दमदार सिनेमॅटिक अनुभव देतो. या लाईन-अपमध्ये 'दिल मदरासी' या चित्रपटाचीही भर पडत असून त्याचा प्रीमियर बुधवार, 3 जून रोजी रात्री 8 वाजता होणार आहे. 'गजनी' आणि 'हॉलिडे'सारखे ब्लॉकबस्टर चित्रपट देणारे दिग्दर्शक ए. आर. मुरुगादोस यांचा हा चित्रपट असून, प्रभावी कथा आणि दमदार ॲक्शन सादर करण्यासाठी ते ओळखले जातात. 'दिल मदरासी' हा ॲक्शन आणि भावना यांचा उत्कृष्ट मेळ असलेला चित्रपट आहे. यात शिवकार्तिकेयन, रुक्मिणी वसंत आणि विद्युत जामवाल यांच्या प्रमुख भूमिका आहेत. शिवकार्तिकेयन एका संघर्षात अडकलेल्या व्यक्तीची भूमिका साकारत आहे, तर विद्युत जामवाल खलनायकाच्या भूमिकेत अत्यंत प्रभावी आणि धडकी भरवणाऱ्या उपस्थितीसोबत झळकतो.

# 'सावरकर सदन' जमीनदोस्त होऊ देणार नाही!

**शासनाने 'सावरकर सदना'चे संपादन करून 'राष्ट्रीय स्मारक' घोषित करावे : हिंदु जनजागृती समितीची आंदोलनाद्वारे मागणी!**

रत्नागिरी (दै. संध्या)




स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतीकारकांचे महामेरू स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या दादर, मुंबई (शिवाजी पार्क) येथील ऐतिहासिक 'सावरकर सदन' या वास्तूवर पुनर्विकासाच्या नावाखाली बिल्डर लॉबीकडून जमीनदोस्त होण्याचे संकट आले आहे. ही ऐतिहासिक वास्तू जमीनदोस्त होण्यापासून वाचवण्यासाठी व तिचे 'राष्ट्रीय स्मारक' म्हणून जतन करण्यासाठी आज हिंदु जनजागृती समिती व समविचारी संघटना यांच्या वतीने येथील जयस्तंभ येथे आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनात श्री. राजेश आयरे (अध्यक्ष, शिक्षक परिषद रत्नागिरी), श्री. नीलेश आखाडे (रत्नागिरी शहर सरचिटणीस, भाजप), श्री. संदीप नाचणकर (जिल्हा उपाध्यक्ष, भाजप, दक्षिण रत्नागिरी), श्री. संजय जोशी (महाराष्ट्र संघटक, महाराष्ट्र मंदिर महासंघ), श्री अनंत आगाशे (अध्यक्ष, कुवारबाव पंचक्रोशी ब्राह्मण सभा), श्री. शैलेश बेर्डे (रत्नागिरी शहर उपाध्यक्ष, भाजप), श्री. गणेश गायकवाड (जिल्हाध्यक्ष, श्रीशिवप्रतिष्ठान हिंदुस्थान, रत्नागिरी), अधिवक्ता श्री सचिन रेमणे (विश्व हिंदु परिषद, धर्मप्रसार विभागप्रमुख), श्री. समीर करमरकर (राष्ट्रीय स्वयंसेवक संघ), सौ. शुभांगी मुळ्ये (सनातन संस्था) यांच्यासह अनेक सावरकरप्रेमी संघटना आणि नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. या वेळी नागरिकांनी सावरकरांच्या जयघोषाने परिसर दणाणून सोडला आणि 'सावरकर सदन वाचवा' अशा घोषणा दिल्या.

आंदोलनादरम्यान हिंदु जनजागृती समितीचे जिल्हा समन्वयक श्री. गोविंद भारद्वाज म्हणाले की, जिन्ना हाऊसला संरक्षण, मग सावरकर सदनावर पडझड का? भारताच्या फाळणीला आणि लाखो हिंदूंच्या कत्तलीला कारणीभूत असणाऱ्या महंमद अली जिन्ना यांचे मुंबईतील 'जिन्ना हाऊस' स्वतंत्र भारतात सुरक्षित राहते; मात्र अखंड भारतासाठी सर्वस्व अर्पण करणाऱ्या स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या निवासस्थानाला पुनर्विकासाच्या नावाखाली पाडण्याची वेळ येते, हे दुर्दैवी आहे.

केंद्र सरकारने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लंडनमधील घर कोट्यवधी रुपये खर्चून ताब्यात घेतले, तसेच इंदू मिलच्या जागेवर भव्य स्मारक उभारले जात आहे. त्याच धर्तीवर स्वा. सावरकर तब्बल ४ दशके (वर्ष १९३८ ते १९६६) राहिले त्या 'सावरकर सदना'चेही शासनाने त्वरित संपादन करावे. बृहन्मुंबई महानगरपालिकेने वर्ष २०१० मध्येच या वास्तूचा वारसा (Heritage) यादीत समावेश करण्याची शिफारस महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाकडे पाठवली आहे; मात्र गेल्या १५ वर्षांत शासनाने यावर अंतिम निर्णय घेतलेला नाही. याचा फायदा घेऊन बिल्डर लॉबी ही वास्तू बळकावण्याचा प्रयत्न करत आहे.

आंदोलकांद्वारे शासनाकडे करण्यात आलेल्या प्रमुख मागण्यामध्ये सरकारने 'सावरकर सदन' पुनर्विकासाच्या कचाट्यातून वाचवण्यासाठी तातडीने हस्तक्षेप करावा आणि या वास्तूचे 'राष्ट्रीय स्मारकात' रूपांतर करावे. या वास्तूची मालकी सरकारने स्वतःकडे घेऊन तिथे सावरकरांच्या हस्तलिखितांचे, पत्रांचे भव्य संग्रहालय, संशोधन केंद्र आणि डिजिटल लायब्ररी विकसित करावी. विद्यमान महायुती सरकारने नेहमीच स्वा. सावरकरांच्या विचारांचा गौरव केला आहे. तसेच केंद्रातील भाजप सरकारने अंदमानच्या विमानतळाला सावरकरांचे नाव, संसदेतील तैलचित्र, १०० रुपयांचे स्वा. सावरकरांचे स्मारक नाणे काढले आहे. त्यामुळे या वास्तूच्या संवर्धनासाठी विशेष निधीची तरतूद करून सकारात्मक निर्णय घेण्याची अपेक्षा याच सरकारकडून आहे.

जर शासनाने या ऐतिहासिक वास्तूचे संरक्षण करण्यासाठी त्वरित पावले उचलली नाहीत, तर संपूर्ण महाराष्ट्रात सावरकरप्रेमी जनतेला सोबत घेऊन हे आंदोलन अधिक तीव्र केले जाईल, असा इशारा शेवटी समितीच्या वतीने देण्यात आला.

## आर्सेलरमित्तल निप्पॉन स्टील इंडियाची जागतिक कामगिरी; एपीआय ५ एल एक्स-१०० समतुल्य अतिमजबूत वेल्डेड पाइप्स निर्मितीत पहिले स्थान

मुंबई (दै. संध्या)



आर्सेलरमित्तल निप्पॉन स्टील इंडिया (एएम/एनएस इंडिया) ने जागतिक दर्जाच्या उत्पादन क्षमतेचे प्रदर्शन करत समुद्री अभियांत्रिकी प्रकल्पांमध्ये वापरल्या जाणाऱ्या सर्वाधिक मजबुतीच्या वेल्डेड पाइप्स (ईक्यू 70 ग्रेड) चे उत्पादन करणारी जगातील पहिली स्टील कंपनी बनण्याचा मान मिळवला आहे. या पाइप्सना अमेरिकन ब्युरो ऑफ शिपिंग ( एबीएस) कडून प्रमाणपत्रही प्राप्त झाले आहे. एबीएस ही अग्रगण्य सागरी वर्गीकरण संस्था असून ती मजबुतीच्या निकषांसह जागतिक मान्यताप्राप्त मानकांचे पालन होत असल्याची स्वतंत्र पडताळणी करते. ऑफशोअर अभियांत्रिकी क्षेत्रात नवा मानदंड प्रस्थापित करत आर्सेलरमित्तल निप्पॉन स्टील इंडियाच्या या उपक्रमामुळे 'आत्मनिर्भर भारत' आणि 'विकसित भारत' अभियानांना मोठे बळ मिळत आहे. या माध्यमातून देशातच सर्वाधिक मजबुतीचे वेल्डेड पाइप्स उपलब्ध होणार असून, सध्या तेल व वायू प्लॅटफॉर्म, ऑफशोअर विंड स्ट्रक्चर्स आणि खोल समुद्रातील पाइपलाइनसारख्या महत्त्वाच्या प्रकल्पांसाठी युरोपमधून आयात केल्या जाणाऱ्या सीमलेस पाइप्सना पर्याय निर्माण होणार आहे. उच्च कार्यक्षमतेच्या या वेल्डेड पाइप्समुळे भारतातील ऑफशोअर आणि अभियांत्रिकी क्षेत्रातील ग्राहकांना पुरवठ्याची अधिक सुरक्षितता, कमी कालावधीत उपलब्धता आणि कमी खर्चाचा फायदा होणार असून, देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पर्धात्मकता वाढण्यास मदत होणार आहे. कंपनीच्या या नव्या प्रगतीमुळे स्टील उत्पादनातील नवोन्मेषासाठीची तिची बांधिलकी अधिक दृढ झाली आहे. यासाठी तिच्या मूळ कंपन्या आर्सेलरमित्तल आणि निप्पॉन स्टील यांचे मजबूत तांत्रिक कौशल्य, संशोधन-विकास क्षमता आणि जागतिक दर्जाच्या कार्यपद्धतींचा आधार लाभला आहे. 'स्मार्टर स्टील्स, ब्राइटर फ्युचर्स' या ब्रँड वचनाशी सुसंगत असलेला हा टप्पा आर्सेलरमित्तल निप्पॉन स्टील इंडियाची सक्षम आणि आत्मनिर्भर देशांतर्गत स्टील परिसंस्था उभारण्यात तसेच अत्यंत विशेष आणि कडक नियमन असलेल्या जागतिक अनुप्रयोगांच्या गरजा पूर्ण करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका अधोरेखित करतो. आर्सेलरमित्तल निप्पॉन स्टील इंडियाने देशातील आघाडीच्या तेल आणि वायू उत्पादक कंपनीला मोठ्या प्रमाणात वेल्डेड पाइप्सचा पुरवठा आधीच केला आहे. अमेरिकन पेट्रोलियम इन्स्टिट्यूट ( एपीआय) 5एल एक्स 100क्यू समतुल्य असलेला ईक्यू 70 ग्रेड हा उच्च मजबुतीचा आणि कमी मिश्रधातू असलेला स्टील ग्रेड असून, त्याची किमान यिल्ड स्ट्रेंथ 690 मेगापास्कल (एमपीए) आहे.

## ब्लेंडर्स प्राईड पॅकेज्ड ड्रिंक्स वॉटरने सादर केले आहे 'रिझर्व्हड एक्सपिरियन्सेस'

जयपूर (दै. संध्या)

ब्लेंडर्स प्राईड पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटरने 'ब्लेंडर्स प्राईड रिझर्व्हड एक्सपिरियन्सेस'चे अनावरण केले आहे, जे सर्व इंद्रियांच्या माध्यमातून - चवीचा कसा अनुभव घेतला जातो - याची पुनर्रचना करण्यासाठी तयार केलेले एक नवीन सांस्कृतिक व्यासपीठ आहे. अशा वेळी जेव्हा ग्राहक अधिक अर्थपूर्ण आणि उच्च दर्जाच्या अनुभवांकडे आकर्षित होत आहेत – जे त्यांच्या स्वतःच्या विकसित होत असलेल्या आवडीनिवडी आणि निवडी प्रतिबिंबित करतात, 'ब्लेंडर्स प्राईड रिझर्व्हड एक्सपिरियन्सेस' चवीला अधिक अर्थपूर्ण रूपात बदलून या बदलाला प्रतिसाद देत आहे. 'रिझवर्व्हड इन एव्हरी सेन्स' या कल्पनेवर आधारित, हे व्यासपीठ चवीला एका




■ **बहु-संवेदी शोधाद्वारे चवीची नवीन व्याख्या**

बहु-आयामी प्रवासाच्या रूपात सादर करते - असा प्रवास ज्याचा केवळ आस्वादच घेतला जात नाही, तर तो पाहिला, ऐकला, स्पर्श केला आणि अनुभवला जाऊ शकतो. शेफ कुणाल कपूर यांच्यासोबत तयार केलेल्या या अनुभवाने एका जिव्हाळ्याच्या आणि विशेष सादरीकरणाद्वारे ही संकल्पना प्रत्यक्षात आणली.

## मच्छीमारांनो सावधान : १ जूनपासून समुद्रात मासेमारीला बंदी

भिवंडी (दै. संध्या)




ठाणे आणि पालघर जिल्ह्यांतील मच्छीमारांसाठी एक अत्यंत महत्त्वाची बातमी आहे. समुद्रातील मासळीच्या साठ्याचे जतन करण्यासाठी आणि पावसाळ्यातील वादळी हवामानापासून मच्छीमारांच्या जीविताचे रक्षण करण्यासाठी शासनाने यंदा १ जून ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत पावसाळी मासेमारीवर अधिकृत बंदी जाहीर केली आहे. ठाणे-पालघर जिल्ह्याचे मत्स्यव्यवसाय सहाय्यक आयुक्त (तांत्रिक) दिनेश पाटील यांनी या संदर्भातील अधिकृत माहिती दिली आहे.

या दोन महिन्यांच्या कालावधीत समुद्रातील माशांचा प्रजोत्पादन काळ असतो, त्यामुळे या बंदीमुळे मासळीच्या बीज निर्मिती प्रक्रियेला मोठा वाव मिळून समुद्रातील मासळीचा साठा वाढण्यास मदत होते.

मत्स्यव्यवसाय विभागाने दिलेल्या आदेशानुसार, ही पावसाळी मासेमारी बंदी सर्व प्रकारच्या यंत्रचलित आणि यांत्रिक नौकांना पूर्णपणे लागू राहील. मात्र, पारंपरिक पद्धतीने मासेमारी करणाऱ्या बिगर-यंत्रचलित नौकांना या बंदीतून सवलत देण्यात आली आहे. सध्या समुद्रात गेलेल्या सर्व यांत्रिक नौकांनी ३१ मे २०२६ पूर्वीच आपापल्या बंदरांमध्ये परतणे बंधनकारक करण्यात आले असून, १ जून किंवा त्यानंतर कोणत्याही परिस्थितीत बंदरांवर मासे उतरवण्यास परवानगी दिली जाणार नाही. तसेच, राज्याच्या सागरी किनाऱ्यापासून १२ सागरी मैलांपर्यंतच्या क्षेत्राबाहेर खोल समुद्रात जाणाऱ्या नौकांना केंद्र शासनाचे धोरण व मार्गदर्शक सूचना लागू राहतील.

या शासकीय नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याचे आवाहन सर्व मच्छीमार सहकारी संस्थांना करण्यात आले आहे. जर बंदीच्या काळात कोणतीही यांत्रिक नौका बेकायदेशीरपणे मासेमारी करताना आढळली, तर महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियमांतर्गत ती नौका, त्यावरील उपसाधने आणि पकडलेली मासळी जप्त करून संबंधित मालकावर अत्यंत कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल. इतकेच नव्हे तर, बंदीच्या काळात समुद्रात जाऊन अपघात झाल्यास अशा नौकेला शासनाकडून कोणतीही आर्थिक नुकसान भरपाई मिळणार नाही, असेही शासनाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे सर्व नौकामालकांनी नियमांचे पालन करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन मत्स्यव्यवसाय विभागाकडून करण्यात आले आहे.

# भाज्यांचे भाव कडाडले, जेवण बेचव झाले

## ठाणे, भिवंडी, मीरा-भाईंदर, नवी मुंबई, वसई येथे भरमसाठ दर वाढले

भिवंडी (दै. संध्या)

वाढत्या भाजीपाला दरांमुळे सर्वसामान्य लोकांच्या खर्चाचे नियोजन विस्कळीत झाले आहे. गेल्या काही दिवसांत टोमॅटो, बटाटे आणि हिरव्या भाज्यांच्या दरात मोठी वाढ झाली आहे. अनेक कुटुंबांनी हिरव्या भाज्यांची खरेदी कमी केली आहे. भाजीपाल्याच्या बाजारात ग्राहकांची गर्दी असली तरी, लोक आता अर्धा किंवा एक किलोऐवजी पाव किलो भाज्या खरेदी करत आहेत.

भिवंडीमध्ये टोमॅटोचे दर ४० रुपयांवरून ८० रुपये प्रति किलोपर्यंत वाढले आहेत.

ठाणे शहरात बटाट्याचे भाव प्रति किलो ५-६ रुपयांनी वाढले आहेत. भेंडीचे भाव प्रति किलो १० रुपयांनी, तर फुलकोबीचे भाव २-४ रुपयांनी वाढले आहेत. दरम्यान, नवी मुंबईत भाजीपाल्याच्या दरात जवळपास ५० टक्क्यांनी वाढ झाली आहे. याशिवाय, भिवंडीत टोमॅटोचे भाव प्रति किलो ४० रुपयांवरून जवळपास ८० रुपयांपर्यंत वाढले आहेत.

अनेक गृहिणींचे म्हणणे आहे की, गॅस सिलिंडर, दूध आणि शिधा आधीच महाग असताना, भाजीपाल्याच्या वाढत्या किमतींमुळे घरगुती बजेटवर अतिरिक्त भार पडला आहे. खर्च कमी करण्यासाठी अनेक कुटुंबे आता जेवणात बदल करत आहेत.



गेल्या दोन आठवड्यांपासून भाजीपाल्याच्या दरात सातत्याने वाढ होत असून, काही भाज्यांच्या दरात आधीच ४० ते ५० टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे.
**- दीपक गुप्ता, व्यापारी, एपीएमसी**

दरवर्षी पावसाळा सुरू झाल्यावर भाव वाढायचे, पण यावर्षी तर उन्हाळ्यातच भाव वाढले आहेत. पेट्रोल आणि डिझेलच्या वाढत्या किमतींमुळे वाहतूकदारांनी मालवाहतुकीचे दर वाढवले आहेत.
**- राजेश प्रजापती, व्यापारी, एपीएमसी**

पेट्रोल डिझेल व इतर इंधनाच्या वाढत्या किमती पाहता, महागाई दररोज वाढत चालली आहे. त्यामुळे भाजीपाला, चिकन, खाद्यपदार्थ इत्यादी खाण्या-वापरण्याच्या वस्तूंच्या किंमतही सारखीच वाढ होत असल्याकारणाने, कुटुंबाची आर्थिक आवक पाहता, महागाईमुळे जगणे मुश्किल होत चालले आहे.
**- कांता धोंडाळे, गृहिणी**

## सोसायट्यांमध्ये होणारी पशूंची अवैध हत्या प्रशासनाने रोखावी !

मुंबई (दै. संध्या)

सोसायटींमध्ये पशूंची हत्या न करण्याचा सर्वोच्च न्यायालयाचा आदेश आहे. असे असूनही मीरा-भाईंदरसारख्या मुसलमानबहुल भागांतील सोसायट्यांमध्ये बकरी ईदनिमित्त हत्या करण्यासाठी पशूंना आणले जात आहे. बकरी ईदनिमित्त सोसायट्यांमध्ये अशा प्रकारे होणारी पशूंची अवैध हत्या प्रशासनाने रोखावी, असे आवाहन हिंदु जनजागृती समितीचे राष्ट्रीय प्रवक्ते श्री. रमेश शिंदे यांनी केले आहे. याविषयी श्री. रमेश शिंदे यांनी मंत्रालयात वृत्तवाहिन्यांच्या प्रतिनिधींना मुलाखत दिली. यावेळी श्री. रमेश शिंदे म्हणाले, "बकरी ईदनिमित्त सोसायट्यांमध्ये बकऱ्या आणून त्यांना कापले जाते. या वेळी रक्तमिश्रित पाणी आजूबाजूच्या परिसरात फेकले जाते. त्यामुळे रोगराई पसरते. याचा प्रशासनाने गांभीर्याने विचार करावा." होळी, गणेशोत्सव आदी हिंदूंच्या सणांच्या



वेळी हिंदी चित्रपट सृष्टीतील कलाकार, तसेच पुरोगामी मंडळी प्रदूषण होत असल्याची आवई उठवून ते रोखण्याचे आवाहन करण्यासाठी पुढे येतात. बकरी ईदनिमित्त पशूंच्या अवैध हत्या करून रक्तमिश्रित पाण्यामुळे होत असलेल्या रोगाच्या प्रादूर्भावाविषयी ही मंडळी का पुढे येत नाहीत ? असा प्रश्न या वेळी श्री. रमेश शिंदे यांनी या वेळी उपस्थित केला.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### दुचाकी व खासगी बसचा भीषण अपघात; एक गंभीर तर एक किरकोळ जखमी

उरुळी कांचन (दैनिक संध्या) : पुणे–सोलापूर महामार्गावरील प्रयागधाम फाटा येथे गुरुवार (ता. २८ मे ) रोजी साडेचार वाजण्याच्या दरम्यान झालेल्या भीषण अपघातात दुचाकीवरील एक जण गंभीर तर एक किरकोळ जखमी झाले आहेत. अपघाताची तीव्रता इतकी होती की दुचाकी थेट बसच्या मागील भागाखाली घुसल्याने तिचा अक्षरशः चक्काचूर झाला. मिळालेल्या माहितीनुसार, खासगी बस (क्र. एमएच 14 जी- यू 6980) ही प्रवाशांना उतरविण्यासाठी महामार्गावर थांबली होती. त्याचवेळी मागून येणारी टीव्हीएस ज्युपिटर दुचाकी (क्र. एमएच 12 आर ई -3794) बसच्या मागील भागावर जोरात आदळली. धडक एवढी भीषण होती की दुचाकी बसच्या खाली घुसली. या अपघातात दुचाकीवरील एकदम फिरते एक किरकोळ जखमी झाला असल्याची माहिती समोर आली आहे. घटनेची माहिती मिळताच उरुळी कांचन पोलीस घटनास्थळी दाखल झाले. तसेच स्थानिक नागरिकांच्या मदतीने जखमींना तातडीने बाहेर काढून उरुळी कांचन येथील एका खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. अपघातामुळे काही काळ महामार्गावरील वाहतुकीवर परिणाम झाला होता. घटनेची माहिती मिळताच सहाय्यक पोलीस निरीक्षक रमेश भोसले पो कॉ प्रदीप बालगुडे, धनंजय भोसले, अमोल खांडेकर होमगार्ड झोगडे यांनी वाहतूक सुरळीत केली. पुढील तपास पोलीस निरीक्षण वागळे यांचे मार्गदर्शनाखाली उरुळी कांचन पोलीस करीत आहेत.

### बनावट डॉक्टरवर यवत पोलिसांची कारवाई

यवत (दैनिक संध्या) : पुणे जिल्ह्यातील यवत पोलीस ठाण्याच्या हद्दीत बनावट वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या एका व्यक्तीवर पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत विविध औषधे, इंजेक्शन, रोकड व चारचाकी वाहन असा एकूण ६ लाख ५४ हजार ९४ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याबाबत यवत पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ५०१/२०२६ दाखल करण्यात आला असून भारतीय न्याय संहिता २०२३ तसेच वैद्यकीय व्यवसाय अधिनियम १९६१ अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २७ मे २०२६ रोजी सकाळी साडेअकराच्या सुमारास दौंड तालुक्यातील कासुर्डी परिसरातील आखाडेवस्ती येथे ही कारवाई करण्यात आली. आरोपी ओमप्रकाश बनसीलाल स्वर्णकर (रा. भिलवाडा, राजस्थान) हा कोणतीही वैद्यकीय पदवी अथवा महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलची नोंदणी नसताना अवैधरित्या क्लिनिक चालवत असल्याचे उघड झाले. छाप्यात पोलिसांनी मोठ्या प्रमाणात ॲलोपॅथिक औषधे, इंजेक्शन, सिरिंज, रिकाम्या बाटल्या, ८५ हजार १०० रुपयांची रोकड तसेच होंडा सिटी कार जप्त केली. आरोपीकडे वैद्यकीय व्यवसाय करण्याचा कोणताही परवाना नसल्याचेही तपासात समोर आले आहे. या प्रकरणी डॉ. आशिष शंकर शिरसे यांनी फिर्याद दिली असून पुढील तपास पोलीस अधिकारी सुवर्णा गोसावी करीत आहेत.



### उन्हाळी बाजरी मळणीत शेतकरी व्यस्त

नारायणगाव (दैनिक संध्या) : जुन्नर तालुक्यात अवकाळी पावसानंतर हवामानात सुधारणा होताच उन्हाळी बाजरी मळणीच्या कामांना वेग आला असून शेतकरी मशीन मिळवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर धावपळ करत आहे. तालुक्यात उन्हाळी बाजरी लागवडीकडे शेतकऱ्यांचा वाढता कल दिसून येते आहे.साधारण तीन ते सव्वा तीन महिन्यांत हे पीक पूर्णपणे तयार होते. कणसामध्ये दाणे भरल्यानंतर गेल्या पंधरा दिवसांपासून बाजरी काढण्याची कामे सुरू होती. मात्र, तीन दिवसांपूर्वीझालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकरी चिंतेत पडले होते. काढून ठेवलेली बाजरी भिजण्याची भीती निर्माण झाल्याने अनेकांनी कामे थांबवली होती. आता पाऊस उघडल्यानंतर शेतकरी पुन्हा जोमाने मळणीकडे वळले आहेत. उन्हाळी बाजरी मशिनद्वारे तयार करण्यासाठी सध्या शंभर किलोमागे सुमारे २०० रुपये दर आकारला जात असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. मात्र, मशीन वेळेवर उपलब्ध होत नसल्याने अनेकांना प्रतिक्षा करावी लागत आहे. हवामान खात्याकडून पुन्हा पावसाचा अंदाज व्यक्त होत असल्याने शेतकरी दिवसभर मशीनची वाट पाहत असून वेळ मिळाल्यास रात्री उशिरापर्यंत शेतात मळणीचे काम सुरू ठेवत आहेत.पिक सुरक्षित घरात आणण्यासाठी सध्या शेतकऱ्यांची मोठी धावपळ सुरू आहे.

# जावई धोंडे जेवायला आले; लाखाचा ऐवज विसरून गेले

## दुकानदाराच्या प्रामाणिकपणामुळे पर्स सुखरूप परत; पोलिसांकडून सत्कार

नीरा (दै. संध्या)

"माणुसकी अजून जिवंत आहे," याची प्रचिती पुरंदर तालुक्यातील नीरा येथे आली. सासरी धोंडे जेवणासाठी आलेल्या जावयाच्या पत्नीची तब्बल लाखाच्या आसपासचा ऐवज असलेली पर्स हरवली; मात्र एका प्रामाणिक दुकानदारामुळे ती सुखरूप परत मिळाल्याने कुटुंबीयांनी सुटकेचा निश्वास टाकला. या प्रामाणिकपणाबद्दल पोलिसांनी संबंधित दुकानदाराचा सत्कार करत समाजासमोर आदर्श निर्माण केला.




पुरंदर तालुक्यातील गुळुंचे येथील जुन्नरकर कुटुंबाचे जावई आपल्या पत्नीसह मंगळवारी सासरी धोंडे जेवणासाठी आले होते. सायंकाळी नीरा शहरात खरेदीसाठी गेल्यानंतर दिपाली कोंढारे यांची पर्स हरवली. या पर्समध्ये तब्बल ७५ हजार रुपये रोख रक्कम आणि सुमारे १५ हजार रुपये किमतीचा चांदीचा गणपती असा मौल्यवान ऐवज होता. पर्स हरवल्याचे लक्षात येताच कोंढारे कुटुंबीयांनी पोलिसांकडे धाव घेतली. पोलिसांनी तत्काळ तपास सुरू करत संबंधित महिला ज्या-ज्या दुकानांमध्ये गेल्या होत्या, तेथे चौकशी सुरू केली. यावेळी पेठेतील "चंदन स्वीट होम" या दुकानात कोंढारे कुटुंब लस्सी पिण्यासाठी गेले होते, तेव्हा ही पर्स तिथेच विसरली गेल्याचे समोर आले.

दुकानदार राजाराम उर्फ मांगीलाल चौधरी यांनी ही पर्स सापडल्यानंतर ती सुरक्षित ठेवली होती. कोणीतरी पर्स शोधत येईल या अपेक्षेने त्यांनी ती बाजूला ठेवत दुकानातील कर्मचाऱ्यांनाही याची माहिती दिली होती. पोलिस आणि कोंढारे कुटुंबीय दुकानात पोहोचल्यानंतर चौधरी यांनी कोणतीही अपेक्षा न ठेवता ती पर्स त्यांच्या ताब्यात दिली.

पर्सची तपासणी केली असता त्यामधील ७५ हजारांची रोख रक्कम आणि चांदीचा गणपती सुरक्षित असल्याचे दिसून आले. यानंतर नीरा दूरक्षेत्रात पोलिस उपनिरीक्षक रविराज कोकरे यांच्या हस्ते चौधरी यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी पोलिस हवालदार संदीप मदने, धनश्याम चव्हाण, निलेश करे, प्रसाद कोळेकर, पोलिस पाटील राहुल शिंदे, तसेच बालाजी कोंढारे आणि राजू जुन्नरकर उपस्थित होते.

कोंढारे कुटुंबीयांनी आनंद व्यक्त करत चौधरी यांना एक हजार रुपयांचे रोख बक्षीस देऊ केले; मात्र "हे माझे कर्तव्यच होते," असे सांगत चौधरी यांनी नम्रपणे ती रक्कम परत केली.

> "राजाराम चौधरी यांनी अत्यंत प्रामाणिकपणे संबंधित महिलेला पर्स परत केली. विशेष म्हणजे त्यांनी पर्स उघडूनही पाहिली नव्हती. अशा प्रामाणिक नागरिकांमुळे समाजात चांगुलपणा टिकून आहे. त्यांचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. नागरिकांनीही खरेदी करताना आपल्या वस्तूंची काळजी घेणे आवश्यक आहे."
> **- रविराज कोकरे, पोलिस उपनिरीक्षक**

## बेनके यांनी घेतली उपमुख्यमंत्र्यांची भेट



नारायणगाव (दै. संध्या)

आदिवासी भागातील कोपरे - मांडवे गावांना स्वातंत्र्यानंतरही पिण्याच्या स्वच्छ पाण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे.या भागातील पाणीटंचाई निवारणासाठी आमदार शरद सोनवणे , खासदार अमोल कोल्हे, आणि माजी आमदार अतुल बेनके यांनी केलेल्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद मिळाला असून, कृष्णा व गोदावरी महामंडळामार्फत हे सर्वेक्षण लवकरच हाती घेण्यात येणार आहे. कोपरे -मांडवे परिसरातील पाणीटंचाईचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी माजी आमदार अतुल बेनके यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची भेट घेऊन सर्वे क्षणासाठी निधीची मागणी केली होती. विधान परिषदेच्या निवडणुकीची आचारसंहिता संपल्यानंतर निधी वितरणाची प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार असून, योजनेतील तांत्रिक त्रुटी दूर करण्यासाठीही प्रयत्न सुरू असल्याचे सांगण्यात आले. त्यावेळी २५ लाख रुपये मंजूर करण्यास सकारात्मक प्रतिसाद देण्यात आला. यावेळी अंकुश आमले,संदीप माळी,बबन तांबे, भीमराव मुठे, तुषार थोरात तसेच कार्यकारी संचालक धुमाळ उपस्थित होते. कोपरे -मांडवे येथे धरण उभारण्याची मागणी अनेक वर्षांपासून होत आहे. मात्र, पाणी उपलब्धतेच्या तांत्रिक कारणांमुळे योजना रखडली होती. आता पश्चिम वाहिनी नद्यांचे पाणी पूर्वेकडील गोदावरी - कृष्णा खोऱ्यात वळविण्याची कामे सुरू असल्याने या योजनेला गती मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. कृष्णा व गोदावरी महामंडळामार्फत बंधाऱ्याचे सविस्तर सर्वेक्षण तातडीने सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे.

## पश्चिम डाक विभागाचा वार्षिक पुरस्कार सोहळा उत्साहात संपन्न

पुणे (दै. संध्या)

पुणे शहर पश्चिम डाक विभागाचा वार्षिक पुरस्कार सोहळा २७ मे २०२६ रोजी सायंकाळी ६:०० वाजता, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परिसरातील भूविज्ञान सभागृहात मोठ्या उत्साहात पार पडला.

पुणे टपाल क्षेत्राच्या पोस्टमास्टर जनरल सुश्री प्रीती अग्रवाल आणि पुणे विभागाचे टपाल सेवा संचालक श्री. अभिजीत बनसोडे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात कु. अनघा भूमकर यांच्या भरतनाट्यम सादरीकरणाने झाली. पुणे शहर पश्चिम डाक विभागाचे अधीक्षक श्री. नितीन येवला यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले आणि गेल्या वर्षभरातील पुणे शहर पश्चिम विभागाच्या कामगिरीचा आढावा घेतला.



२०२५-२०२६ या वर्षात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा या सोहळ्यात सत्कार करण्यात आला. व्यवसाय वाढ, पीएलआय/आरपीएलआय, पोस्ट ऑफिस बचत बँक, टपाल कामकाज आणि ग्राहक सेवा यांसारख्या क्षेत्रांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या कर्मचाऱ्यांना आणि महिला बचत एजंटांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. पुणे शहर पश्चिम विभागात कार्यरत असलेल्यां खेळाडूंनाही त्यांच्या कामगिरीबद्दल पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.पुणे टपाल क्षेत्राचे संचालक श्री. अभिजीत बनसोडे यांनी विभागीय स्तरावरील पुरस्कार सोहळ्यात सात प्रतिष्ठित पुरस्कार मिळाल्याबद्दल पुणे शहर पश्चिम विभागाचे अभिनंदन केले. त्यांनी स्पीड पोस्ट व्यवसायाचा विस्तार करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याचे आवाहनही केले. पुणे शहर पश्चिम विभागातील सर्व अधिकारी आणि कर्मचारी यापेक्षाही आणखी चांगली कामगिरी करू शकतात आणि त्यांनी ती करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली. आपल्या अध्यक्षीय भाषणात, पुणे विभागाच्या पोस्टमास्तर जनरल सुश्री प्रीती अग्रवाल यांनी सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना आपल्या विभागाचा अभिमान बाळगण्याचे आवाहन केले. त्यांनी आर्थिक समावेशन आणि पार्सल वाहतुकीविषयी मौल्यवान माहिती दिली. त्यांनी सोप्या उदाहरणांद्वारे पोस्टमनच्या भूमिकेचे महत्त्व स्पष्ट केले आणि सर्व टपाल कर्मचाऱ्यांना प्रोत्साहित केले. याप्रसंगी त्यांनी नमूद केले की, महिला प्रधान बचत एजंट टपाल विभागात सामील होऊन आर्थिक समावेशनाच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत. त्यांनी महिला प्रधान बचत एजंट्सच्या कार्याची प्रशंसा केली आणि त्यांचे योगदान प्रेरणादायी असल्याचे म्हटले. त्यांनी भारतीय टपाल विभागाची पार्सल लॉजिस्टिक्स प्रणाली भविष्यासाठी महत्त्वपूर्ण असल्याचेही वर्णन केले. त्यांनी यावरही भर दिला की, जनतेची खऱ्या अर्थाने सेवा करण्याचा आणि त्यांच्या विकासात योगदान देण्याचा टपाल सेवा हा सर्वोत्तम मार्ग आहे. त्यामुळे, त्यांनी सर्व कर्मचाऱ्यांना आपली कर्तव्ये निष्ठेने पार पाडण्याचे आवाहन केले. शेवटी, त्यांनी सर्व पुरस्कार विजेत्यांचे अभिनंदन केले आणि त्यांना त्यांचे चांगले कार्य पुढे चालू ठेवण्यासाठी प्रोत्साहित केले.

> श्री. सिद्धार्थ हरळे यांनी आभार व्यक्त केले आणि भारतीय राष्ट्रगीताच्या गायनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## नीरा येथे बकरी ईद उत्साहात साजरी

नीरा (दै. संध्या)

पुरंदर तालुक्यातील नीरा येथे बकरी ईद (ईद उल अजहा) गुरूवारी (दि.२८ ) उत्साहात साजरी करण्यात आली. ईदनिमित्ताने मुस्लिम बांधवांनी एकमेकांना शुभेच्छा दिल्या.

नीरेतील स्टेशन मस्जिद येथे मौलाना मोहंम्मद मेराज यांच्या नेतृत्वाखाली ईदगाह मैदानात नमाज पठण करण्यात आली. तसेच अंजुमन तारीमुल कुरआन येथील मस्जिदमध्ये मौलाना अमानुल्ला शेख

यांच्या नेतृत्वाखाली नमाज पठण करण्यात आली. मौलाना मोहंम्मद मेराज यांनी बकरी ईदच्या सणाला मुस्लिम धर्मियांत विशेष महत्व आहे असे स्पष्ट केले. इस्लाम धर्माचे पैगंबर हजरत हब्राहिम अलैही सलाम यांना अल्लाहने स्वतःच्या आवडत्या वस्तूचे त्याग करण्याचा आदेश दिला होता.



अल्लाहच्या या आदेशानुसार हजरत इब्राहिम यांनी त्यांची आवडती व्यक्ती त्यांचे सुपुत्र हजरत इस्माईल यांचा त्याग करण्याची वृत्ती अल्लाहच्या पसंतीस उतरली.त्यावेळी हजरत इस्माईल यांना वाचवण्यासाठी अल्लाहने त्यांच्या जागी बकऱ्याला ठेवले. त्यावेळी बकऱ्याची कुर्बानी देण्यात आली. अशा रितीने मौलाना मोहंम्मद मेराज यांनी पैगंबर हजरत इब्राहिम यांच्या आठवणींना उजाळा दिला. यावेळी नीरा व परिसरातील बहुसंख्येने मुस्लिम बांधव उपस्थित होते.

> स्टेशन मस्जिदमध्ये जि.प.चे माजी बांधकाम सभापती दत्ताजीराव चव्हाण, माजी उपसरपंच राजेश काकडे, माजी ग्रा.पं.सदस्य प्रमोद काकडे यांनी मुस्लिम बांधवांना शुभेच्छा दिल्या. निरा पोलीस दुरक्षेत्राचे फौजदार सर्जेराव पुजारी यांच्यासह पोलिस कर्मचा-यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

## कर्तव्यावर असलेल्या शिक्षिकेवर काळाचा घाला

नारायणगाव (दै. संध्या)

जनगणनेला जाताना कान्हेफाटा, ता.मावळ येथील भीषण अपघातात शिक्षक भगिनी दीपाली सुजित तांबे यांचे आज दुर्दैवी निधन झाले. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली. सध्या संपूर्ण देशभरात अत्यंत महत्त्वाची अशी जनगणनेची मोहीम अत्यंत वेगाने राबवली जात आहे. या राष्ट्रीय पातळीवरील अतिशय महत्त्वपूर्ण कार्यात अनेक सरकारी कर्मचारी आणि विशेषतः शिक्षक वर्ग अत्यंत मोलाची आणि महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. मात्र हेच राष्ट्रीय कर्तव्य अत्यंत निष्ठेने बजावण्यासाठी जाणाऱ्या एका महिला शिक्षिका तसेच जनगणना प्रगणक दीपाली सुजित तांबे यांच्यावर अतिशय दुर्दैवी आणि अकल्पित वेळ ओढवली आहे. पुणे जिल्ह्यातील मावळ परिसरामध्ये घडलेल्या एका अत्यंत भीषण आणि दुर्दैवी रस्ते अपघातात या कर्तव्यदक्ष शिक्षिकेचा जागीच मृत्यू झाला आहे. या हृदयद्रावक आणि मन हेलावून टाकणाऱ्या घटनेमुळे संपूर्ण शैक्षणिक वर्तुळात तसेच पुणे जिल्ह्यात शोक व्यक्त केला जात आहे. त्या मूळच्या आंबेगाव तालुक्यातील मंचर येथील रहिवासी होत्या. मात्र नोकरी आणि कुटुंबाच्या सोयीसाठी सध्या त्या पुणे नजीकच्या चिंचवड भागातील तानाजीनगर येथे वास्तव्यास होत्या.

# आंतरराष्ट्रीय मासिक पाळी दिनानिमित्त आळंदीत "रजोत्सव" उत्साहात

आळंदी (दै. संध्या)

आंतरराष्ट्रीय मासिक पाळी दिनानिमित्त आळंदी नगरपरिषद, क्षितिज बहुउद्देशीय संस्था तसेच युनिसेफ, वॉश युनायटेड आणि वॉश इयर्स कोऑलिशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित "रजोत्सव" उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. महिला आरोग्य, मासिक पाळीबाबत जनजागृती आणि समाजात सकारात्मक दृष्टीकोन निर्माण करण्याच्या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमात "मासिक पाळी विषयातील पुरुषांचे योगदान" या संकल्पनेला विशेष महत्त्व देण्यात आले. यावेळी मासिक पाळी जनजागृती प्रतिज्ञापत्राचे विमोचन करण्यात आले तसेच उपस्थितांनी मासिक पाळी स्वच्छता प्रतिज्ञा घेऊन समाजात जागरूकतेचा संदेश दिला.




क्षितिज संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा स्नेहल चौधरी यांनी मासिक पाळीदरम्यान महिलांनी घ्यावयाची स्वच्छता, आरोग्याची काळजी, पोषण आहार, पुरुषांचा सहभाग तसेच रजोनिवृत्ती याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. मासिक पाळीबाबत समाजात असलेले गैरसमज दूर करून संवेदनशील आणि सकारात्मक वातावरण निर्माण करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

मुख्याधिकारी माधव खांडेकर यांनी महिलांसाठी व किशोरवयीन मुलींसाठी "आनंदी रूम" सारखी सुविधा आळंदीमध्ये उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे सांगितले. महिलांच्या आरोग्यविषयक उपक्रमांना नगरपरिषदेचे सहकार्य कायम राहील, अशी ग्वाहीही त्यांनी दिली. कार्यक्रमास नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, उपनगराध्यक्षा सुजाता तापकीर, महिला व बालकल्याण सभापती ऋतुजा तापकीर, नगरसेविका साक्षी कुऱ्हाडे, पूजा घुंडरे तसेच नगरपरिषदेचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुख्याधिकारी माधव खांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली वैशाली पाटील, क्षितिज सामाजिक संस्थेच्या स्नेहल चौधरी, युनिसेफचे आनंद घोडके, संदीप तेंडुलकर यांच्या सहकार्याने अंकिता गुडजी, अतुल राऊत, राजलक्ष्मी पाटील, निसर्गा मेश्राम, अमृता आणि निशांत यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष प्रयत्न केले. महिलांच्या आरोग्य, स्वच्छता आणि सन्मानाबाबत समाजामध्ये जागरूकता निर्माण करणारा हा उपक्रम उपस्थितांकडून कौतुकास पात्र ठरला. मासिक पाळी ही लाज नसून नैसर्गिक प्रक्रिया आहे आणि त्याविषयी खुलेपणाने संवाद होणे आवश्यक असल्याचा संदेश कार्यक्रमातून देण्यात आला.

